# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३६ । वर्ष १४ अंक १०
वार्षिक वर्गणी ₹ १८०

विद्यार्थी विशेषांक



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक!

## यापुढे यशाकडे...

यापुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची ।। ध्रु. ।।

शक्ति-युक्ति-बुद्धिने सुजाण यत्न चालवू
संपदा समर्थता उदंड आम्ही मेळवू
सावधान पाउले जयाप्रतीच जायची ।। १ ।।

वज्रता विनम्रता तनूमनात बाणवू
स्नेहशील एकता निजांतरात तेववू
वीजवादळातही ज्योत ना विझायची ।। २ ।।

अजिंक्य झेप आपुली अशक्य शब्द नेणते
'मृगेन्द्रता स्वयं हि एव' मंत्र एक जाणते
सार्थ तो करू अशी शपथ ही वहायची ।। ३ ।।

विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू
तेज मायभूमीचे उभ्या जगास दाखवू
चेतना स्वरातली उरात जागवायची ।। ४ ।।



# छात्र प्रबोधन

**सौर आषाढ, शके १९३६। वर्ष १४ अंक १०**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २६४ वा अंक, वर्ष २२ अंक १२

**प्रकाशन दिनांक – सौर १० आषाढ, शके १९३६/१ जुलै २०१४**


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

विद्यार्थी विशेषांक

## • अंतरंग •


| | | |
|---|---|---|
| ४. | **संवाद** | – महेन्द्र सेठिया |
| | **मनोगत** | – विद्यार्थी संपादक मंडळ |
| ५. | कथा ... **गूढ** | – चि. राजस सुतार |
| ८. | कविता... **सुंदर पहाट** | – कु. संयोनी वरणकार |
| ९. | प्रवासवर्णन... **राजगड... गिरिभ्रमण !!** | – कु. मैत्रेयी हातवळणे |
| ११. | चित्रपट परिचय... 127 Hours | – कु. अनुजा आफळे |
| १३. | प्रेरणादायी... **साथी हाथ बढाना... अर्थात श्रमदान** | – चि. श्रीरंग टोके |
| १५. | माहितीपर... **पावसाळी पाहुणे** | – कु. हर्षदा काळे |
| १६. | कविता... **वृक्षांची किमया** | – कु. कल्याणी महाजन |
| १७. | पर्यटन... **अनोखे कृषिपर्यटन** | – चि. रुचिर कुलकर्णी |
| १९. | संवाद कौशल्य... **त्यावेळी मी आत्मविश्वासाने बोलायला हवं होतं !** | – चि. प्रथमेश डोळे |
| २१. | नाट्यछटा... **आनंदाने खेळू या !** | – चि. गुंजन मोहकार |
| २३. | छात्र प्रबोधन उपक्रम... **विकसता विकसता विकसावे...** जोडीकार्य, अभिवाचन, कार्यानुभव | – कु. सानिका कुलकर्णी<br>– कु. मृण्मयी परळीकर<br>– चि. कौस्तुभ जोशी |
| २७. | पुस्तक परिचय... **चीपर बाय दी डझन** | – कु. मंजिरी पुरोहित |
| २८. | कविता... **छात्र प्रबोधन** | – कु. आकांक्षा भवर |
| ३१. | अनुभवपर... **छंद जोपासत शिक्षण** | – कु. रितिका साठे |
| ३३. | कथा... **रहस्य त्या झाडाचे** | – कु. आरती चौधरी |
| | मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **यापुढे यशाकडे...** | – डॉ. स्वर्णलता भिशीकर |

**याशिवाय** – हसा हसा.. (७, १२, २९), आधुनिक म्हणींची चंम्मत ग ! (८), ऐकाऽ हो ऐकाऽऽ (१४), प्रतिसादी वाचकवीर व्हा... ४ (२०), विशेष कौतुक (२२), शब्दकोडं (२९), कागदी हिरा (३२) **या अंकातील पानाखालील ओळी पावसाळा ऋतुशी निगडित.**


**तळटिपेतील ओळी** – भारतातील काही प्रथितयश उद्योग समूहांची माहिती.

**मुखपृष्ठाविषयी** – मी हे चित्र काढण्यासाठी जलरंगांचा वापर केला आहे. हे चित्र रंगवायला मला सुमारे अडीच तास लागले. लहानपणापासून चित्र काढून ते जलरंगानं रंगवणे हा माझा छंदच आहे. सुरुवातीला मी एखादं निसर्गचित्र पेन्सिलनं काढून घेतो व ते स्वत:च्या मनानं रंगवतो. मला असं वाटतं की, 'समोरच्या दृश्याचा खरेपणा व आपलं त्या दृश्याशी असलेलं नातं, हे जर कागदावर उतरवता आलं; तर आपल्याला त्या चित्रातून खरा आनंद मिळतो.'

**– चि. निहार साठे** (इ. १२ वी) पुणे


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**
महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**
शिल्पा कुलकर्णी

**♦ संपादक मंडळ ♦**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

**♦ विद्यार्थी संपादक मंडळ ♦**
मंजिरी पुरोहित, अनुजा आफळे,
सानिका कुलकर्णी, श्रीरंग टोके,
कौस्तुभ जोशी, रूचिर कुलकर्णी,
रितिका साठे

**♦ मुखपृष्ठ ♦**
निहार साठे



**♦ संपर्क पत्ता ♦**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**ई–मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी**
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.

**या अंकाची किंमत : ₹ १५**

(पुण्याबाहेरील धनादेशासाठी- ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)



**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

।। **अधिक जाणून घ्या : टाटा समूह** – स्थापना – १८६८, संस्थापक – जमशेटजी टाटा – स्टील, ऑटोमोबाइल, कन्सल्टन्सी क्षेत्र ।।

## संवाद

*शिकण्यातलं स्वावलंबन जोपासू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,*

पूर्णत: विद्यार्थ्यांच्या साहित्य–चित्रकृतींनी तयार झालेला **छात्र प्रबोधनचा हा पंधरावा विद्यार्थी विशेषांक** आणि विद्यार्थी संपादक मंडळाने संपादित केलेला आठवा अंक ! यावेळच्या विद्यार्थी संपादक मंडळातील सर्वच विद्यार्थ्यांनी निव्वळ संपादनाचे काम केले नाही, तर सुमारे दोन महिने 'छात्र प्रबोधन'च्या सुट्टीतील उपक्रमांमध्ये (कार्यानुभव, जोडीकार्य, अभिवाचन कार्यशाळा) त्या सर्वांनी अत्यंत उत्साहाने भाग घेतला. संपादक मंडळातील सर्वांनीच या अंकात काही ना काही लेखनही केले आहे. दहावीच्या या सर्व विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेतही उत्तम गुण मिळाले आहेत. या सर्वांबद्दल या विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक !

हे सर्व विद्यार्थी छात्र प्रबोधनमध्ये विविध प्रकारची कामे करत असताना मी त्यांना अधूनमधून काही प्रश्न विचारायचो. त्यातून ते नुसतंच काम करत आहेत, की त्या कामातून काही शिकतही आहेत; हे मला समजून घ्यायचं होतं. 'कोणीतरी बसवून शिकवल्याशिवाय शिकताच येणार नाही', अशी तुमच्यापैकी अनेकांची मानसिकता झालेली असते. खरं तर शिकण्याची वृत्ती असली, हौस असली, मनापासूनची इच्छा असली, तर तुम्ही करत असलेल्या प्रत्येक कृतीतून, ज्यांच्याबरोबर काम करता त्यांच्या निरीक्षणातून, 'जे काम करत आहात त्यामागचा हेतू काय? त्यातून काय साध्य करायचंय? ते काम उत्तम करायचं म्हणजे काय? त्या कामातून काय परिणाम अपेक्षित आहे?' अशा प्रश्नांची उत्तरे मिळविण्यातून, तुम्ही नकळतपणे खूप काही शिकू शकता. त्यालाच म्हणायचं **शिकण्यातलं स्वावलंबन !** मग ते पाठ्यपुस्तके शिकतानाही तुम्ही वापरू शकाल. नवीन धडा शिकविण्यापूर्वी तो वाचून, त्यातील शंका–प्रश्न नोंदवून मग वर्गात शिकायला बसलात, तर शिकण्यातल्या स्वावलंबनाच्या दिशेनं दोन पावलं तुम्ही पुढे गेलात. 'त्या शंकांची उत्तरे माझी मीच मिळवीन' असं म्हणत ती मिळवण्यासाठी धडपडणं, हे त्याच्या पुढचं पाऊल. 'जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांना शिकवावे' हे त्याच्याही पुढचं एक पाऊल.

यावर्षीच्या गुरुपौर्णिमेला गुरुंबद्दलचा आदरभाव, कृतज्ञताभाव तुम्ही व्यक्त करालच. त्याचबरोबर शिक्षणातील स्वावलंबनाच्या पुढच्या–पुढच्या पायऱ्या तुम्ही चढत जाण्याचा संकल्प केलात आणि त्याप्रमाणे कृती करायला लागलात तर तुमच्या गुरूंना त्याचा मनापासून आनंद होईल, यात शंकाच नाही. त्यासाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा !!

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**

## मनोगत

''सानिका, तुझं चित्राचं काम झालं का? आणि रुचिर तुझ्या लेखाचं काय? चला, सगळेजण आता *प्रूफ रिडींग* करायला बसा...'' अशा अनेक संवादांनी गेले दोन महिने 'छात्र प्रबोधन'चं कार्यालय गजबजून गेलं होतं.

त्याचं झालं असं... सुट्टीत कार्यानुभव उपक्रमात सहभागी होण्यासाठी आम्ही सर्वजण छात्र प्रबोधनच्या कार्यालयात हजर झालो. या सगळ्यामागचा हेतू हा की, घरातल्या टी.व्ही आणि कॉम्प्युटरला थोडीशी विश्रांती द्यावी आणि नेहमीपेक्षा वेगळे अनुभव घ्यावेत. मासिक कसं तयार होतं हे जवळून अनुभवताना, इथे ताईंनी सांगितलेली छोटी–मोठी कामं करता करता विद्यार्थी विशेषांकाबद्दल ऐकलं आणि हा आगळावेगळा अनुभव घेण्यासाठी आम्ही सात जण विद्यार्थी संपादक मंडळात सामील झालो.

खरं सांगायचं झालं तर... या अंकाचं काम करता करता आम्ही बरंच काही शिकलो. स्वत: लेख लिहिण्यापासून ते मुलांचं साहित्य निवडण्यापर्यंत, तळटिपेसाठी माहिती गोळा करणं, चित्रकार शोधणं, अंकाची मांडणी करणं आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे सात डोक्यांच्या मतभेदातून योग्य कल्पना निवडून, त्यावर सर्वांचं एकमत करून घेणं. विद्यार्थी विशेषांक करताना मिळालेली एक अभूतपूर्व भेट म्हणजे आम्हाला योग्य मार्गदर्शन करणाऱ्या आणि आमचा गोंधळ सहन करणाऱ्या ताई आणि नवे मित्रमैत्रिणी !!

आपल्या घरी दर महिन्याला येणाऱ्या ३६ पानी अंकामागे केवढी सारी मेहनत असते; हे आम्हा सर्वांना कळून चुकलं. आम्ही सर्वांनी केलेल्या या खटाटोपातून तयार झालेल्या या विद्यार्थी विशेषांकाची सफर तुम्ही आता अनुभवणार आहात! तुमच्या सर्वांच्या प्रतिक्रियांची आम्ही आतुरतेनं वाट पाहात आहोत.

**– विद्यार्थी संपादक मंडळ**



**झुळझुळ वारा, पावसाच्या धारा । आनंदली धरा, फुलला आसमंत सारा ।।**



।। **अधिक जाणून घ्या : डाबर** – स्थापना – १८८४, संस्थापक – एस. के. बर्मन – आयुर्वेदिक औषधे क्षेत्र ।।

**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे** - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.



# गूढ

– चि. राजस सुतार

"हां सर ! हां, ओके सर, मी आत्ताच निघतो. ओके. बाय सर!''

विशाल म्हणाला, ''सागर, आत्ताच डॉ. पुराणिकांचा फोन आला होता.''

''अरे विशाल, आपल्याला आता कुठं जायचंय का?'' सागरनं विचारलं.

विशालनं सॅक चढवत उत्तर दिलं,

''अरे, हो सागर. आपल्याला आता *एअरपोर्टवर* जायचंय. डॉ. पुराणिकांचे मित्र डॉ. फ्रँकना *पिकअप* करायला हवंय.''

त्यावर सागर घाईघाईत संगणकावर काहीतरी करायला लागला आणि म्हणाला,

''मग थांब जरा, *युएसबीमध्ये* माझं *powerpoint presentation* *कॉपी* करून त्याची प्रिंटआऊट काढायला हवी,'' विशाल बूट चढवू लागला. सागरनं *युएसबी* काढून घेत लॅपटॉप बंद केला.

''चला निघूया.''

थोड्या वेळानं एक काळी *skoda एअरपोर्टमध्ये* शिरली. विशालनं *Airport Lounge* जवळ गाडी थांबवली व ते दोघंही प्रवेशद्वारापाशी उभे राहिले. बरीच माणसं हातात विविध नावांचे *बोर्ड* घेऊन उभे होते. कुणाच्या घरची मंडळी आतून बाहेर येणाऱ्या लोकांकडे पाहून हात हलवत होती. थोड्या वेळानं एक गोरा परदेशी, उंच मनुष्य बाहेर आला.

''डॉ. फ्रँक?'' सागरनं डॉ. फ्रँकचं लक्ष आपल्याकडे वेधलं. डॉ. फ्रँक त्यांच्याकडे चालत आले, *''येस! आर यू सागर अँड विशाल?''*

*''यस सर, गुड मॉर्निंग सर!''*

*''यस, हाऊ प्लेझंट! नाईस टू मीट यू.''*

पंधरा मिनिटात सागर, विशाल आणि डॉ. फ्रँक, डॉ. पुराणिकांच्या घरी पोहोचले.

'' डॉ. फ्रँक तुमचं स्वागत आहे! मी तुमची वाटच बघत होतो!'' डॉ. पुराणिक डॉ. फ्रँकबरोबर हस्तांदोलन करत म्हणाले.

''मीपण तुम्हाला भेटायला उत्सुक होतो!'' डॉ. फ्रँक तुटक–तुटक मराठीत म्हणाले.

सागर आनंदित झाला, ''यू *स्पीक वेरी गुड* मराठी!''



**चिंब पान न् पान, ओले सारे रान । धरतीला असे दान, हरपून जाते भान ।।**

।। **अधिक जाणून घ्या : किर्लोस्कर उद्योग समूह** – स्थापना–१८८८, संस्थापक – लक्ष्मणराव किर्लोस्कर–इंजिन्स्,पम्पस् क्षेत्र ।।



**प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनु पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सस, अमेरिका.**




"जास्त नाही! *सो लिटल.* कामासाठी बराच काळ मी इथे घालवला आहे," डॉ. फ्रँक.

विशालची नजर पूर्णवेळ डॉ. फ्रँकवर होती. न जाणो का; पण डॉ. पुराणिकांना व विशालला डॉ. फ्रँकविषयी संशय येत होता. विशाल म्हणाला, "डॉ. फ्रँक तुमच्या विद्यापीठाचं नाव काय म्हणालात?"

त्यावर डॉ. फ्रँक अडखळत म्हणाले, "म मी *Winson* विद्यापीठात आहे. *धिस युनिव्हर्सिटी इज वाईडली नोन फॉर इट्स आर्कियॉलॉजी रिसर्च.* "

"ओ, वॉव सर! मग माझं आमच्या औरंगाबादमधल्या जुन्या मूर्तीचं *presentation* तुम्हाला आवडेल," सागर म्हणाला.

डॉ. पुराणिकांनी घसा साफ केला. सगळे शांत होऊन परत त्यांच्याकडे पाहू लागले.

"मी आपल्या दौलतगडाच्या लेण्यांविषयी तुम्हाला सांगितलंच आहे. अर्थात सागरनं त्याच्याबद्दल *पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन* केलंय; पण तो विषय वेगळा आहे." असं म्हणून त्यांनी दीर्घ श्वास घेतला.

"डॉ. फ्रँक तुम्हाला, दीड-दोन महिन्यांपूर्वी तिथे झालेल्या नटराजाच्या चोरीबद्दल मी मध्यंतरी माहिती दिली होती ना?"

"चोरी? विशालनं आश्चर्यानं विचारलं."

"तुम्ही कधी आम्हाला याबाबत बोलला नाहीत," विशाल पुढे म्हणाला.

"*एक्झॅटली* विशाल! पण नटराजाची चोरी झाली हे वृत्तपत्र व इतर माध्यमांना व पोलिसांना अद्याप कळलं नाही. माझ्या एका मित्रानं योगायोगानं त्या चोरी झालेल्या मूर्तीच्या जवळ एक *मिनीकॅमेरा* ठेवला होता. त्यामुळे ते कळलं. मग त्यानं आम्हाला संपर्क केला. पण कॅमेऱ्यामध्ये चोर पाठमोरे दिसतायंत."

"पण सर, नटराजाची मूर्ती तर अजून तिथेच आहे!" सागर कुतूहलानं म्हणाला.

"बरोबर. त्याचीपण एक गंमत सांगतो," ते हसत म्हणाले,

"ती मूर्ती खोटी आहे!"

"काय? खोटी?" विशाल उद्गारला.

"*हाऊ इंटरेस्टिंग!* ती *idol Replace* केली का?" डॉ. फ्रँकनी विचारलं. ते आता फार गंभीर व उत्सुक दिसत होते.

"*Correct* डॉ. फ्रँक! चोरी झाल्यावर लगेचच तशी मूर्ती त्या ठिकाणी ठेवली गेली," डॉ. पुराणिकांनी खुलासा केला.

"पण डॉ. पुराणिक, त्यांनी ती मूर्ती चोरली तरी कशी? आणि *replace* तरी कशी केली?" विशालनं प्रश्न केला.

"सांगतो. ते चोर खूप हुशार होते. 'पुरातन मूर्तींचा अभ्यास करायचा आहे' असं सांगून काही जणांना तिथं प्रवेश मिळाला होता. त्याचा फायदा घेऊन त्या मूर्तीपर्यंत त्यांनी भुयारी मार्ग तयार केला. त्याच मार्गाने मूर्तीची चोरी झाली. त्या जागी त्याची प्रतिकृती म्हणजे ती खोटी मूर्ती ठेवली गेली. 'जुन्या मूर्तीची चोरी नेमकी कशासाठी झाली?' मित्रांनो, या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी आपण आज रात्री दौलतगडावर जाणार आहोत!"

"*ओ, वाव!*" सागर, विशाल दोघे उत्साहित झाले.

रात्री ७.३० वाजता ४ जण दौलतगडाच्या लेण्या पाहत होते. नंतर मूर्तीची चोरी झालेल्या ठिकाणी ते सर्व गेले. डॉ. पुराणिकांनी आजूबाजूला पाहिलं. नंतर ते खाली वाकले. त्यांनी नटराजाच्या मूर्तीला हात लावला. नंतर खिशातून एक काचेची छोटी पट्टी काढली व एका सुरीने ते मूर्ती खरवडू लागले. खरवडून झाल्यावर ते खरवडलेले कण त्यांनी काचेच्या पट्टीवर घेतले व ते म्हणाले, "विशाल, हे घे उद्यापर्यंत या कणांचं *ॲनॅलिसीस* करून दे." विशालनं ती पट्टी घेतली. त्यावरील कण सांभाळून एका डबीत भरले व डबी जवळच्या बॅगेत टाकली.

"चला आपलं काम झालंय. आता ती चोरी का झाली हे शोधायला हवं," डॉ. पुराणिक म्हणाले.

त्यांनी नटराजाच्या मूर्तीला हात



**पाऊस पाऊस म्हणजे दुसरे काय? ढगाला फुटतात असंख्य पाय, न्हाऊन निघते धरतीमाय।।**



।। **अधिक जाणून घ्या : गोदरेज समूह** – स्थापना – १८९७, संस्थापक – अरदेशीर गोदरेज – कन्झ्युमर प्रॉडक्टस् क्षेत्र ।।

**प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लासगो, स्कॉटलंड (U.K.)**

लावला. त्यांचं बोट मूर्तीच्या पोटावर पडलं व अकस्मात त्या पोटाचा तुकडा पडला... चौघंही विस्मयानं त्या मूर्तीकडे पाहू लागले.

''*ओ गॉड* ही मूर्ती तर तुटली!'' डॉ. पुराणिक घाबरत म्हणाले,

''*I will manage*! हे माझ्यासाठी सोपं काम आहे,'' असं म्हणून डॉ. फ्रँक खाली वाकले. त्यांनी खिशातून एक गोंदासारखी वस्तू काढली. ते डॉ. पुराणिकांकडे पाहून म्हणाले, ''तुम्ही व्हा पुढे. मी हे काम आटपून येतो.''

तिघंही निघून गेले; पण विशाल एका भिंतीपाशी थांबला. सागर व डॉ. पुराणिक निघून गेल्यावर विशाल पटकन डॉ. फ्रँक जिथे होते तिथे लपला. त्यांनी खिशातून एक पुडी काढली. डॉ. फ्रँकनी मूर्ती जोडली होती; पण ते उठले नाहीत. त्यांनी फोन लावला. डॉ. फ्रँक काय करतायंत ते विशालनं पाहिलं आणि आपल्या कॅमेरात *शूट* केलं. ठरल्याप्रमाणे डॉ. पुराणिकांना विशालनं ते *शूट* दाखवलं. डॉ. पुराणिक हसले.

दुसरा दिवस उजाडला. सागरनं डॉ. पुराणिकांना विचारलं,

''डॉ. फ्रँक फिरायला गेलेत. अहो, पण ३ तास झाले आता! ते आहेत तरी कुठे?''

तेवढ्यात पेपरवाल्यानं पेपर आत सरकवला. सागरनं पेपर उचलला व तो अवाकच झाला. ''डॉ. पुराणिक हे पाहा! दौलतगडाच्या लेण्यांमध्ये हिऱ्यांचं *स्मगलिंग* झालं. एक अट्टल गुन्हेगार पकडला गेला.''

तेवढ्यात दार उघडून विशाल आत आला. दमून बसला. डॉ. पुराणिकांनी हसून विचारलं, ''अरे, डॉ. फ्रँक कुठे आहेत?''

त्यावर विशाल हसून म्हणाला, ''खरं तर ते सकाळी माझ्या बरोबर नव्हतेच. ते मध्यरात्रीपासून जेलमध्येच आहेत.''

''काय?! जेल?'' सागर ओरडला.

''हो, सागर सांगतो. जरा दम धर. डॉ. फ्रँक एक सराईत*स्मगलर* निघाले. त्यांनी काल मूर्ती जोडण्याच्या निमित्ताने त्यात हिरे भरले. जवळजवळ दोन लाख डॉलरचे होते ते. नंतर त्यांनी हिरे घेणाऱ्याला फोन केला व हिरे ठेवल्याचे सांगितले. मी ही बातमी डॉ. पुराणिकांना दिली. त्यांनी पोलिसांना लगेचच फोन लावला. पुढच्या हालचाली वेगात घडल्या,'' विशाल म्हणाला. ''तरीच, एवढी रात्र झाली तरी मला माझं प्रेझेंटेशन तुम्ही डॉ. फ्रँकना दाखवायला सांगितलं. अशा प्रकारे त्यांना मी गुंतवून ठेवलं तर...''




सागर उलगडा झाल्यासारखं म्हणाला. ''डॉ. पुराणिकांना डॉ. फ्रँकचा दाट संशय होता. गेली दोन-तीन वर्ष असंच होतंय. फ्रँक भारतात येऊन गेल्यानंतरच ठिकठिकाणच्या मूर्तींच्या चोऱ्या होत होत्या. अर्थात त्यातील जोखीम लक्षात घेता तस्करीच्या दृष्टीनं त्या मूर्तींची किंमत काही फार नव्हती. तरीही या आपल्या पुरातन ठेव्याचं रक्षण करणं हे आपलं कर्तव्य आहे. शिवाय 'मूर्तींची चोरी कशासाठी?' या प्रश्नाचं उत्तर मिळवायचं होतं. या चोऱ्यांमध्ये डॉ. फ्रँकचा हात आहे की, हा योगायोग आहे हे शोधयचं होतं. त्यासाठी कामाचं निमित्त पुढं करून डॉ. पुराणिकांनी फ्रँकला बोलावून घेतलं. पुढचं सारं तुमच्यासमोर घडलं. डॉ. फ्रँक जेलमध्ये आहेत व एका केसचा निकाल लागला आहे !...''

★★★

– **चि. राजस सुतार** (इ. ९ वी)
फाटक हायस्कूल, रत्नागिरी
***चित्रकार :*** *अनुजा कानसे*

## *हसा हसा..*

**काका** : शेजारच्या जोशांकडून Iodex आण.
**काकू** : संपलंय म्हणतायत.
**काका** : काय कंजूष लोकं आहेत ! शेजारधर्म आहे की नाही?
**काकू** : जाऊ दे, मी घरातली Iodex ची बाटली काढते!


**सोनू** : बाबा उद्या शाळेत छोटीशी पालक सभा आहे.
**बाबा** : छोटीशी म्हणजे कशी?
**सोनू** : म्हणजे मी, मुख्याध्यापक आणि तुम्ही !




**आला पाऊस, आला पाऊस, रान भिजुनी चिंब झालं। भिजली झाडे, भिजल्या वेली, राने सारी ओली झाली।।**

।। **अधिक जाणून घ्या – बजाज समूह** – स्थापना–१९२६, संस्थापक–जमनालाल बजाज – स्टील, ऑटोमोबाईल, फायनान्स क्षेत्र।।

**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.**




# सुंदर पहाट



सुंदर किती पहाट
घालुनि केशरसडे
शिंपली पूर्व दिशेची वाट
सुंदर किती पहाट !

लाल गुलाबी उडे धुराळा
त्यात मिसळला प्रकाश पिवळा
सूर्याचा रथ चढुनि आला
आभाळाचा घाट !

पक्षी सारे उंच उडाले
मंजुळ गाणी गाऊ लागले
रविराजाची कीर्ती गाती
गोड गळ्याचे भाट !

सुगंध सगळा पाकळ्यांतला
कळ्याफुलांनी पाहा उधळला
चहुदिशांस तो पसरित आला
वारा पाठोपाठ !

रंग मनोहर, गाणी सुरवर
वारा झरझर, परिमल सुंदर
प्रकाश पसरे जिकडे तिकडे
शोभेचा हा थाट !

**– कु. संयोनी वरणकार** (इ. १० वी)
खंडेलवाल इंग्लिश स्कूल, अकोला
***चित्रकार :*** *संयोनी वरणकार*

## आधुनिक म्हणींची चंम्मत ग !

१) रिकाम्या पर्सला हेलकावे फार.
२) आधीच कर्जबाजारी त्यात उसना शेजारी.
३) असतील मते तर टिकतील नेते.
४) साखरेचे खाणार त्याला मधुमेह होणार.
५) भक्त जातो देवापाशी, ध्यान त्याचे चपलेपाशी.
६) अभ्यास सेकंदभर लाईट रात्रभर.
७) नाचता येईना, कॅसेट संपली.
८) जागा थोड्या, अर्ज फार.
९) तांबे गेले, पितळ गेले, हाती प्लॅस्टिक आले.

**– कु. जान्हवी संजय सपकाळ** (इ. ९ वी), स्व. शेठ रा. कि. लाहोटी कन्या प्रशाला, कराड

**पाऊस पाऊस म्हणजे दुसरे काय? दुसरे तिसरे काहीच नाय, सगळी वरुणराजाची कृपा हाय।।**

।। **अधिक जाणून घ्या : सिप्लाफार्मा** – स्थापना – १९३५, संस्थापक – के. हमीद – फार्मास्युटीकल क्षेत्र ।।

**प्रायोजक - श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.**

प्रवास हा माझ्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. सतत भटकंती करणं हा जणू आता माझा छंदच बनून गेला आहे. नुकतंच शाळेमध्ये नेतृत्व प्रशिक्षण शिबिर झालं. शिबिरानंतर आमची राजगडावर सहल गेली. त्यावेळी केलेली भटकंती संस्मरणीय आहे.

गडात गड असा राजगड ! सगळ्या गडांचा राजा अशी त्याची ख्यातीच पसरलेली आहे.
श्री शिवछत्रपतींनी स्वराज्याची योजलेली ही पहिली राजधानी; महाराजांच्या योजकतेचं एक उत्तम उदाहरण. हा गड चढणं म्हणजे एक अलौकिक दिव्य आणि ते दिव्य मी अनुभवलं !!

आमच्या सोबत ज्ञान प्रबोधिनीच्या युवती विभागातल्या युवती आणि शिक्षिका होत्या. पहिल्यांदा आम्ही बसनं स्वारगेटला पोहोचलो. गुंजवणे गावाच्या बससाठी थोडी वाट पहावी लागली. त्यानंतर बस आली आणि राजगडाच्या दिशेनं आमचा प्रवास सुरू झाला. जसं आम्ही पुण्याच्या बाहेर पडलो तसा थंड वारा वाहू लागला आणि निसर्गाची किमया आम्ही पाहू लागलो. गावाचे प्रदूषणविरहित वातावरण मी अनुभवू लागले. शिवरायांच्या गडावर जायचे म्हणून आम्हाला स्फुरण चढले होते. आम्ही 'रणी फडकती' सारखी जोशपूर्ण पद्ये म्हणू लागलो. जसे-जसे आम्ही गावाजवळ पोहोचत होतो तसे-तसे मावळे आणि महाराज आमच्या मनात भिनत चालले होते. बसमध्ये येणारी वाऱ्याची मंद झुळूक गडावर चढण्यासाठीचा आमचा उत्साह वाढवत होती. मजल-दरमजल करत आम्ही गुंजवणे गावात पोहोचलो. तिथे वीज नव्हती. गाव अंधारात होतं. आम्ही तिथं मुक्काम केला. आम्हाला थोडा काळ का होईना ग्रामजीवन अनुभवता आलं. शेणानं सारवलेल्या जमिनीवर रात्री जेवण करण्यात एक 'गावरान' मजा होती. तिथे आम्ही ज्यांच्याकडे राहिलो त्या मराठी कुटुंबातील माणसांनी, आपल्या मुलाची प्रेमळपणाने चौकशी करावी; तसं अगत्यानं आम्हा मुलींचं स्वागत केलं.

आम्ही रात्री तीन वाजता गड चढणार होतो. हा अनुभव काही वेगळाच होता. 'ज्या गडाला



# राजगड ... गिरिभ्रमण !!

**– कु. मैत्रेयी हातवळणे**

***सोबतचा लेख राजगड चढण्याच्या अनुभवावर आधारित आहे. पहाटे तीन वाजता गड चढण्याचा अविस्मरणीय अनुभव आपल्या मैत्रिणीनं कसा घेतला, तिनं कोणकोणत्या आव्हानांचा सामना केला, त्याचं रोमहर्षक वर्णन या लेखात वाचूया...***

शिवरायांसारख्या वीरपुरुषाचा आणि जिजाऊंसारख्या मातोश्रींचा सहवास लाभला;' त्या गडावर आपल्याला जायचंय ही भावना रोमांचित करणारी होती. काहीजणी म्हणाल्या, ''बापरे ! एवढ्या मोठ्या उंच गडावर अंधारात आपण चढू शकू का?'' तर काही आत्मविश्वासानं म्हणाल्या, ''आम्हाला नक्कीच जमेल हे.''

तीन वाजता मी गड चढण्यासाठी तना-मनासहित सज्ज झाले. या अपूर्व कामगिरीआधी मी मनोमन महाराजांचे आणि मावळ्यांचे स्मरण केलं. आम्हाला दोन टेकड्या चढून मग राजगड चढायचा होता.

रात्रीच्या किर्रर्र भीषण शांततेत फक्त रातकिड्यांची किरकिर तेवढी ऐकू येत होती. आमच्या पन्नास जणींची शंभर पावलं गडाच्या ओढीनं झपाझप पडत होती. थोड्या वेळासाठी आम्ही झाडाखाली विसावलो. विजेऱ्यांचा प्रकाश बंद झाला. आकाशात असंख्य तारे आणि चांदण्या लुकलुकत होत्या. जणूकाही त्यांनापण



ढगामागे ढग दाटले आभाळी। सोनतुऱ्यांच्या फुलांत, वीज भरली पिवळी।।

।। **अधिक जाणून घ्या – एशियन पेन्टस्** – स्थापना – १९४२, संस्थापक – चंपकलाल चोक्से – पेन्टस् क्षेत्र ।।



**प्रायोजक - श्री. नचिकेत खरे, पुणे.**



**राजगडावरील हत्तीचं नेढं**

आम्ही कसे चढतो ते पाहायचे होते ! आकाशातलं पिठूर चांदणं सगळ्यांना खुणावत होतं. त्यानं एक अनामिक शक्ती दिली. 'शिवाजी महाराज की जय' ही घोषणा देऊन चढायला सुरुवात केली. मग घोषणांचा सपाटाच लावला. विविध रुंद, अरुंद, काटेरी-दगडी अशा बिकट वाटा आता येऊ लागल्या; तरीही आम्ही चालत होतो. सूर्य हळूहळू उदयास येत होता. त्याच्या तेजस्वी प्रकाशामुळे गड उजळून निघाला. पहाटेचं धुकं अंगावर लपेटून सूर्याची पिवळी-केशरी किरणं अंगावर झेलणारा गड भलताच सुंदर दिसत होता.

बिकट वाटांमुळे गड जरी अवघड, कठीण वाटत होता; तरीही वाटेतल्या डेरेदार बहरलेल्या वृक्षांनी विसाव्याला जागा दिली. गडावर पोहोचायच्या वेळी आम्हाला दगडी मार्ग लागला. तो अवघड असल्याने तिथे मात्र आमच्या क्षमतेचा कस लागला. आम्ही अवघड अशा चोर दरवाज्यातून गडावर पोहोचलो. 'त्या काळात महाराजांनी आणि मावळ्यांनी किल्ला कसा लढवला असेल, झुंजत ठेवला असेल', या विचाराने मी स्तिमित झाले.

आम्ही गडावर पोहोचल्यानंतर सगळ्यांना 'हुश्श' झालं. थंड हवेच्या झुळूकांमुळे थकवा कुठल्या कुठे पळून गेला. त्यानंतर आम्ही गड फिरण्यास सुरुवात केली. तिथला पद्मावती तलाव पाहिला. शंकराचं देऊळ बघितलं. त्यानंतर अंबरखाना बघितला. मग हत्तींचं नेढं पाहिलं. सुवेळा माची पाहिले. तिथल्या गोष्टींना महाराजांचा इतिहास लाभला होता. त्यामुळे गड




पाहण्यात वेगळीच मजा आली. वेळेअभावी बालेकिल्ला आणि संजीवनी माची पाहता आली नाही. याचे वाईट वाटले. पण जणू ती ठिकाणेच आम्हाला परत येण्याचे निमंत्रणचं देत होती.

मग आम्ही काटक्या-कुटक्या गोळा केल्या. चूल पेटवली आणि स्वयंपाक केला. चुलीवर स्वयंपाक करण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता. त्यातही मजा आली. स्वत: बनवलेले पदार्थ खाऊन आम्ही तृप्त झालो. जरा आराम करून गड उतरण्यास सुरुवात केली. दगडी मार्गावरून उतरताना आपण या कड्यावरून चढलो होतो, हे खरंच वाटेना. उतरताना सूर्य डोक्यावर होता त्यामुळे उन्हाचा तडाखा जाणवू लागला. उतरताना काही मुली पुढे, तर काही मागे राहिल्या. त्यामुळे आपोआपच आमचे गट पडले. मी ज्या गटात होते, तो गट रस्ताच चुकला; पण उशीरा का होईना चुकत-माकत आम्ही योग्य त्या ठिकाणी पोचलो. एकूण किल्ल्याची बांधणी पाहून महाराजांच्या शक्ती-युक्तीची आणि दूरदृष्टीची कल्पना आली.

राजगड राजधानी असताना अफलजखानाचा वध झाला. वधानंतर महाराजांनी आदिलशाहाच्या ताब्यातील बराच प्रदेश जिंकला व शत्रूला सळो की पळो करून सोडले. त्यांची औरंगजेबाशी आग्र्यात भेट झाली. आग्र्यातून सुटून महाराज सर्वप्रथम राजगडावरच आले होते. गड पाहताना महाराजांच्या निर्णयक्षमता, अचूक नियोजन या गुणांची मनात परत उजळणी होत होती. स्वराज्य उभे राहात असतानाचा इतिहास राजगडाने पाहिला व अनुभवला. त्याच्या प्रत्येक अणूत या आठवणी विसावल्या आहेत.

*शिवरायाचे आठवावे रूप ।*
*शिवरायांचा आठवावा प्रताप ।।*

आजही तिथल्या दगड-मातीतून, वाऱ्यातून देशभक्तीचा सुगंध येतो.

★★★


**- कु. मैत्रेयी हातवळणे** (इ. ८ वी)
ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे - 44


**पहिल्या पावसानं क्षुब्ध धरा सुखावली । गावधूळ झटकून वृक्षराई तेजाळली ।।**




।। **अधिक जाणून घ्या : महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा समूह** - स्थापना - १९४५, संस्थापक - जगदीशचंद्र महिन्द्रा-ऑटोमोबाईल, फायनान्स।।


**प्रायोजक - श्री. संदीप जगधने, पुणे.**

## चित्रपट परिचय

**– कु. अनुजा आफळे**




'परिस्थिती माणसाचे पूर्ण आयुष्यच बदलून टाकते', असे म्हटले जाते. हे विधान खरे ठरवणारा चित्रपट म्हणजे **127 Hours.** कोणत्याही धर्मसंकटात सापडले असताना देखील माणसाची जगण्याची इच्छा कधीच कमी होत नाही, हे आपल्याला या चित्रपटातून पाहायला मिळतं.

दिवस शुक्रवार. तारीख २५ एप्रिल २००३. बाकीच्या संपूर्ण जगासाठी हा धावपळीनं भरलेला नेहमीसारखा दिवस असला तरी ॲरन राल्स्टन *(Aron Ralston)* हा या दिवशी अमेरिकेतील उथा येथील *'कॅनियनलॅन्ड नॅशनल पार्क'* मध्ये भटकंतीसाठी *(हायकिंगसाठी)* जाणार असतो. गाडी पार्क करून सायकलवर टांग टाकून ॲरन सुसाट कॅनियनच्या दिशेनं जातो.

नंतर कॅनियनमध्ये फिरत असताना त्याला क्रिस्टी आणि मेगन या दोन मुली भेटतात. त्यापण ट्रेकिंगसाठी आलेल्या असतात. रस्ता सापडत नसल्यामुळे संभ्रमात असलेल्या त्यांना ॲरन म्हणतो की, ''मी इथला गाईड आहे मी तुम्हाला एक नवीन व *इंटरेस्टींग* मार्ग दाखवतो.'' तो त्या मुलींना एका ठिकाणी आणतो. जिथे फक्त एक माणूस मावू शकेल एवढीच जागा असते. समोरासमोर भिंती असतात व एक भूमिगत पाण्याचं तळं असतं. ते तिघं जण ॲरनच्या कॅमेरामधून पाण्यात उडी मारण्याचे शूटींग करतात. नंतर त्या दोघींना मार्ग दाखवून व त्यांचा निरोप घेऊन ॲरन आपल्या वाटेनं निघतो.

ॲरन *'कॅनियन'* मधून जायला लागतो. एका टप्प्यावर अरुंद वाटा, खाचखळगे आणि खडक मोठ्या प्रमाणात असतात. तो टप्पा पार करत असताना अचानक एक मोठा दगड सैल पडून ॲरनच्या हातावर पडतो आणि त्याचा उजवा हात दगडाखाली सापडतो. एकदम घाबरून जाऊन ॲरन मदतीसाठी जोरजोरात हाका मारतो. पण त्या महाप्रचंड *कॅनियन लॅन्ड* मध्ये कोणालाच त्याचा आवाज ऐकू येत नाही.

ॲरन थोडा वेळ शांत राहायचा प्रयत्न करतो. पण त्याच्यापुढील धोक्यांची कल्पना त्याला आलेली असते. 'आता आपल्यालाच यातून काहीतरी मार्ग काढावा लागेल' असे तो स्वत:ला समजवायचा प्रयत्न करतो. ॲरन आपल्या बॅगेतील अन्न-पाणी तपासून पाहतो. जेमतेम एक ते दीड दिवस पुरेल एवढंच पाणी त्याच्याकडे शिल्लक राहिलेलं असतं. एवढ्यात ॲरनच्या लक्षात येतं त्यानं घरातून निघताना कोणालाच त्याच्या भटकंतीविषयी काही निरोप दिलेला नसतो ! 'आपल्या घरचे आपली नक्कीच काळजी करत बसणार' या विचारांनी तो अस्वस्थ होतो.

आपल्याजवळील *पॉकेट नाईफच्या* आधारे ॲरन दगड *सैल* करण्याचा प्रयत्न करतो; पण काहीही निष्पन्न होत नाही. असाच एक दिवस सरतो. आता ॲरनजवळ अन्न व पाणी अजिबातच शिल्लक राहिलेलं नसतं. शेवटी ॲरनला शिवांबू पिण्यावाचून पर्याय नसतो. या दृश्याच्या वेळेस ॲरनच्या चेहऱ्यावरचे भाव अप्रतिम घेतले आहेत. जगण्यासाठी माणूस काहीही करू शकतो याचे हे जिवंत उदाहरण आहे.

सुरुवातीला ॲरनला वाटत असतं की आपण समर्थ



आहोत. आपण कोणाचीही मदत न घेता प्रत्येक गोष्ट करू शकतो; पण संकटात सापडल्यानंतर आत्मपरिक्षण करताना त्याला आपल्या माणसांची, घरच्यांची किंमत कळते.

ॲरन आपल्या कॅमेऱ्यातून स्वत:चे शुटिंग करतो. आपण काही आता जगत नाही, या जाणीवेनं अफाट खिन्न झालेला ॲरन व्हिडिओमध्ये सर्वांची माफी मागतो. आई, बाबा, बहीण, मित्र–मैत्रिणी या सर्वांनी आपल्यासाठी खूप काही केलं आहे; असं म्हणताना ॲरन भावूक होतो व आपल्या देखील डोळ्यात नकळत पाणी येतं.

शेवटी एक क्षण असा येतो की या संकटावर मात करण्याचा तो निश्चय करतो. आपण इथं असं स्वत:च्या दैवाला दोष देत बसायचं नाही, हे तो मनोमन ठरवतो. इंजिनियर असलेला ॲरन आपल्या जवळ असलेला सुरा व बाकी साहित्याच्या आधारे एक हत्यार तयार करतो व त्याचा वापर करून स्वत:ची सुटका करून घेतो. आपणही प्रेक्षक म्हणून त्याच्या या प्रयत्नांचे मूक साक्षीदार होतो. 'पुढे काय घडेल' याविषयी आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. हे सुटकेसाठीचे त्याचे प्रयत्न बघताना आपल्या




अंगावर अक्षरश: काटा उभा राहतो. स्वत:चा जखमी हात एका कापडात गुंडाळून मग ॲरन त्या जागेचे फोटो काढतो. स्वत:ला कसाबसा सावरत तो जिद्दीने ६५ फूट मोठा खडक उतरतो. थकलेला, भागलेला जखमी ॲरन एका कुटुंबाला सापडतो. ते कुटुंब त्याला मदत करतात. त्याच्यासाठी हेलिकॉप्टरची सोय करतात. हेलिकॉप्टरच्या साहाय्यानं ॲरनला हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते. जगण्यासाठी ॲरनची एकशे सत्तावीस तासांची कडवी झुंज यशस्वी ठरते.

ॲरन राल्स्टनच्या भूमिकेत जेम्स फ्रॅन्को *(James Franco)* कमालच करतो. त्याची त्या कॅनियनमधून बाहेर पडण्याची धडपड, कुटुंबाविषयी काळजी हे सर्व त्यानं अगदी नेमकेपणाने साकारलंय. क्रिस्टी व मेगन च्या भूमिकेत केट मारा व मेगन मॅकब्राईड या दोघी मुलींनी चित्रपटाला हलकंफुलकं बनवण्याचं काम चोखपणे पार पाडलंय. दिग्दर्शक डॅनी बॉयल यांचा 'स्लमडॉग मिलेनिअर' नंतरचा हा सर्वोत्कृष्ट चित्रपट आहे असे म्हणता येईल. ऑस्कर विजेते भारतीय संगीतकार *A. R. Rehman* यांनी चित्रपटाला संगीत दिले आहे. हा चित्रपट खुद्द ॲरन रास्ल्स्टन लिखित *'Between a Rock and a Hard place'* या आत्मचरित्रावर आधारित आहे.

चित्रपट बघताना आपल्या लक्षात येतं की, आपण एकदा ठरवलं ना... की आपण कुठल्याही संकटाचा सामना जिद्दीनं करू शकतो.

★★★

– **कु. अनुजा आफळे** (इ. १०वी), वेस्टर्न कोर्ट, नवी पेठ, पुणे –30

## *हसा हसा..*

पहिला मुलगा : माझे बाबा एवढे उंच आहेत की ते छताला हात लावतात.
दुसरा मुलगा : माझे बाबा एवढे उंच आहेत की ते विमानाला हात लावतात.
तिसरा मुलगा : माझे बाबा खूप उंच आहेत पण ते असले चाळे करत नाहीत.

पिंकी : आई, फळीवर केळी आहेत ती घेऊ मी?
आई : हो!
पिंकी : किती बरं झालं तू हो म्हणालीस ते!
आई : का, इतकी भूक लागली आहे वाटतं अगदी?
पिंकी : नाही गं, मी ती कधीच खाल्ली आहेत!

**निद्रावश जन झाले अवघे नांदे शांती दिशात। मात्र मिणमिणे पणती अजुनी ही माझ्या घरात।।**



।। **अधिक जाणून घ्या : अमूल** – स्थापना – १९४६, संस्थापक – वर्गीस कुरियन – दूध व दुग्धजन्य उत्पादन क्षेत्र ।।

**प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२० - २४४५०९७५**

# साथी हाथ बढाना... अर्थात श्रमदान

– चि. श्रीरंग टोके

***वेल्हे तालुक्यातील वरोती गावात युवकांनी श्रमदान करून त्या गावाचा पाण्याचा प्रश्न तडीस नेला. याबद्दलचा अनुभव श्रीरंगनं आपल्याबरोबर 'शेअर' केला आहे. हा अनुभव वाचून समाजाच्या उपयोगी काम करण्याची व त्याप्रमाणे कृती करण्याची प्रेरणा आपल्यालाही मिळेल, यात शंका नाही.***



जमिनीवर पाणी टाकताच क्षणार्धात त्याचं वाफेत रूपांतर व्हावं असं अक्षरश: भाजून काढणारं ऊन, यत्किंचितही वारा नाही, अंगावर हाफ पँट आणि पंचा गुंडाळलेला आणि डोक्यावर गोल अंपायर टोपी... सर्व युवक घमेली *'पास'* करता करता सामूहिक प्रबोधन गीते गात आहेत, अंग घामानं चिंब भिजलेलं; पण मन मात्र हास्यविनोदात रमलेलं...

हे वर्णन आहे श्रमदान शिबिराचं. **'श्रम ही है श्रीराम हमारा'** या प्रेरक वाक्याची प्रचीती नुकत्याच झालेल्या श्रमदानातून मी घेतली. ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामविकसन या विभागांतर्गत चालणाऱ्या दुष्काळ निवारण योजनेत आम्ही श्रमदानास गेलो होतो. त्याबद्दल माझा अनुभव मी तुम्हाला सांगणार आहे.

तोरणा किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या वेल्हे या तालुक्यातील वरोती नावाचं लहानसं गाव. या गावामध्ये नागरिकांचा पाणीप्रश्न सुटावा म्हणून *ब्लास्टिंगद्वारा* एक विहीर खोदण्यात आली. त्याद्वारा निघालेले दगड *जेसीबीच्या* साहाय्यानं विहिरीच्या बाजूलाच टाकण्यात आले होते. त्याचा एक छोटासा डोंगरच विहिरीभोवती तयार झाला होता. *ब्लास्टिंग* केल्यामुळे विहीर भूपातळीच्या खाली गेली होती. दगडधोंडे वापरून तिची समान पातळी करायची होती. त्यासाठी विहिरीतून बाहेर काढण्यात आलेले दगडच आम्ही वापरणार होतो.

या पार्श्वभूमीवर आम्ही आठ युवक ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या इमारतीत जमा झालो व वरोती गावास रवाना झालो. इतर युवक माझ्यापेक्षा वयानं मोठे असल्यामुळे त्यांच्या गाडीवर बसून मी जात होतो. नसरापूर फाटा ओलांडल्यावर नीरव शांतता, दाट नसलं तरीही रात्रीच्या काळोखात अंगावर येणारं जंगल, रस्त्यावर एकही दिवा नाही, फक्त गाड्यांचा तेवढा 'लाईट'. अविस्मरणीय प्रवास होता तो ! दुर्गम भागात जात असल्यानं धड रस्तेही नव्हते. त्यामुळे ओबडधोबड रस्त्यांवरून... रस्ते नव्हे; पायवाटाच त्या ! त्यांच्यावरून दगड चुकवत चुकवत आम्ही बसल्याबसल्या गाडीवर उड्या मारत होतो. मध्ये एका गावातून घमेली घेतली व साधारण रात्री एक–दीड वाजता वरोतीस पोहोचलो. एका मंदिरामध्येच मुक्काम ठोकला. डोक्याखाली बॅग घेतली व तसंच झोपी गेलो. पांघरुण नाही का अंथरूण नाही...

सकाळी सहा वाजता उठून उपासना केली. चहा घेतला आणि कामाला लागलो. वरकरणी पाहता वाटले, 'हे काय अर्ध्या तासाचे काम.' पण ते करण्यास आठ तास कडक उन्हात श्रमदान करावे लागेल, याची कल्पनाही आली नाही. सुरुंग लावून दगड फोडल्यामुळे विहीर तयार झाली होती. त्याचबरोबर त्या दगडांचा एक छोटा डोंगरच तयार झाला होता. या छोट्या डोंगरावर आम्ही माथा ते



जोराने नुकतीच येऊन गेली पावसाची सर । गेले पांगुन मेघ आकाश दिसे धूसर ।।

।। **अधिक जाणून घ्या : जिंदल समूह :** स्थापना – १९५२, संस्थापक – ओमप्रकाश जिंदल – सिमेंट, पेट्रोल, स्टील क्षेत्र ।।



प्रायोजक -डॉ. संदीप श्रोत्री, सातारा.



पायथा अशी कार्यकर्त्यांची एक साखळी तयार केली आणि काम सुरू झालं. वरती दोघेजण घमेल्यांमध्ये दगड भरण्यास व बाकीचे घमेली पास करण्यासाठी ठेवले. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणा देतच कार्यकर्ते घमेली पुढच्या हातात देत होते. दर अर्ध्या तासाने आम्ही जागा बदलत होतो; जेणेकरून कामाचा कंटाळा येऊ नये. 'कामातील बदल हीच विश्रांती', हे ब्रीदच बनले होते. मोठमोठे दगड उचलण्यास मात्र विशेष कष्ट लागले. पण सर्वचजण हसत खेळत कामात दंग होते; म्हणून वेळ कसा गेला हे समजलंच नाही आणि प्रखर उन्हामध्ये काम करतोय याची जाणीवही तीव्र झाली नाही.

संपूर्ण शरीर घामानं चिंब ओलं झालं होतं. म्हणून मग मध्यंतर केलं. आमच्यापैकी एकाने कलिंगड कापलं व आम्ही सर्वजण त्यावर तुटून पडून दोन मिनिटात ते कलिंगड फस्त केलं. घमेल्यांवर घमेली येत गेली, खड्डा हळूहळू बुजत गेला आणि 'आता शेवटचा अर्धा तास', असं म्हणत-म्हणत आम्ही साधारण तीन वाजेपर्यंत काम केलं आणि अखेर खड्डा बुजवला. विहिरीची पातळी सामान्य भूपातळीस आली. कष्टाचं चीज झालं. सकाळी सात ते दुपारी तीन असं आठ तासांचं आमचं श्रमदान झालं.

दुपारच्या जेवणाची गावकऱ्यांनीच सोय केली होती. कष्टाची भाकर खाण्याचा वेगळाच आनंद यावेळी मी अनुभवला. अर्ध्या तासाच्या वामकुक्षीनंतर आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. या विहिरीचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. 'नागरिकांचा पाणीप्रश्न सोडवण्यामध्ये आपलाही खारीचा वाटा आहे' या जाणीवेनं ऊर आनंदानं भरून आला.




समृद्ध बनवणारा असा हा अनुभव केवळ अविस्मरणीय! किमान एकदा तरी प्रत्येक युवकानं त्यामध्ये सहभागी व्हावं, अशा प्रकारचा अनुभव घ्यावा. पुढचा शनिवार-रविवार नव्या जोमानं, उमेदीनं, वाढलेल्या संख्येनं श्रमदानास जाण्याचा निश्चय करूनच आम्ही रात्री झोपी गेलो.

★★★

- **चि. श्रीरंग टोके,** (इ. १० वी)
चंद्राई अपार्टमेंट, तुळशीबागवाले कॉलनी,
सहकारनगर क्र. २, पुणे - 9

***ऐका ऽ हो ऐकाऽऽ***

**प्रबोधक मंडळ सुरू होतंय हो ऽ ऽ ऽ**

**इ.६ ते ८ वीच्या छात्र प्रबोधनच्या**
**पुण्यातील सभासदांसाठी**

**नावनोंदणी** : १५ जुलै २०१४ पर्यंत
**शुल्क** : ₹ १०० फक्त
**स्थळ** : ज्ञानप्रबोधिनी, पुणे

**प्रबोधक मंडळाची वैशिष्ट्ये**

- वर्षभरासाठीचा उपक्रम (दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी दु. ३ ते ५)
- अभिव्यक्तीची विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी !
- छात्र प्रबोधनच्या साहित्यावर आधारित गटचर्चा, रसग्रहण इ.
- हस्त कौशल्ये आणि बरेच काही...

**संपर्क - ☎ ०२०-२४२०७१७४/१७९**

**छात्र प्रबोधनचे सभासद म्हणून कृतिशील व्हा !**

पुण्याव्यतिरिक्त डोंबिवलीमध्येही प्रबोधक मंडळ सुरू
**संपर्क -** अरुणा केळकर मोबा. ९९६९९२१५६९

**अन्य गावांमध्ये प्रबोधक मंडळे सुरू करू इच्छिणाऱ्या पालक, शिक्षकांनी संपर्क साधावा. त्यांना सर्वतोपरी सहकार्य मिळेल !**



झाला सूर्य पुन्हा प्रकाशित, पडे हे ऊनही कोवळे। विविध रंगछटा खुलुनिया, भासे अंबर सोवळे।।



।।**अधिक जाणून घ्या : भारत फोर्ज** - स्थापना-१९६१, संस्थापक - नीळकंठराव कल्याणी - इंजिनियरींग, फोर्जिंग इक्विपमेंटस्।।

**प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे.**

# पावसाळी पाहुणे



**– कु. हर्षदा काळे**

पावसाळा आणि नवनिर्मितीचे समीकरण आपल्याला माहीतच असते. ओल्या मातीतून उगवलेली रोपटी ते ओलसर भिंतीवरचे शेवाळे, सर्वच सजीव तेव्हा आनंदी असतात. जशी ही हिरवळ सर्वत्र उत्साह पसरवत वाढत असते तसे तिच्यावर अवलंबून असलेले जीवजंतूही वाढीस लागतात. काही फुलपाखरांप्रमाणे लोभस तर काही आजार पसरवणारे....

म्हणूनच या पाहुण्यांची पुरेशी माहिती घेणेही फायद्याचे ठरते. चला, तर मग या मित्रांची नीट ओळख करून घेऊ...

पावसाळा सुरू होण्यापूर्वी एक दोन दिवस अचानक अंधारून येते, सूर्य लवकर मावळला असेच वाटते. अशा वेळी दिव्याभोवती लहान लहान माशा उडताना दिसतात. या माशा पावसाळा 'येत' असल्याचा संदेश देतात म्हणून यांना 'पावसाळी माशा' असंही म्हटलं जातं.



**पावसाळी माशा**

यांचा आकार जास्तीत जास्त १ ते २ से.मी. असतो. या माशांचे शरीर तांबूस तपकिरी असून त्यांना पंखांच्या दोन जोड्या असतात. हे कीटक प्रकाशाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात.

पावसाळी माशांप्रमाणे आपल्याला अनेक कीटक उडताना दिसतात. त्यांपैकी कोवळ्या गवतावर उडणारी फुलपाखरे हा सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय आहे.


आधी अंड– मग आळी – त्यानंतर कोष – मग त्यातून बाहेर येणारं फुलपाखरू हे चक्र तर सर्वांनाच माहीत असतं. आपण हे चक्र थोडं अधिक बारकाव्यांसह जाणून घेऊ.

फुलपाखराची मादी रुई प्रमाणे चिकट पाने असलेल्या वनस्पतीवर आपली अंडी घालते. ती मुद्दाम अशी जागा निवडते; जिथे बाहेर येऊन अळीचं फुलपाखरू होतं. या फुलपाखराला पुढे व मागे मिळून दोन पंखांच्या जोड्या असतात. पंखांवरील सूक्ष्म खवल्यांचा एकत्रित परिणाम म्हणून फुलपाखरांचे रंग तयार होतात. हिवाळ्यात जेव्हा तापमान खाली जाते, तेव्हा ते एका उबदार ठिकाणी निपचित पडून राहतात व शरीरातील ऊर्जेची बचत करतात. यालाच 'हिमनिद्रा' म्हणतात. फुलपाखरे फुलांनी बहरलेली बाग, झाडी, पाणथळ जागांकडे नेहमी आकर्षित होतात.

हं! मात्र, रात्री घरात येणारी दिव्याभोवती फिरणारी 'फुलपाखरं' तुम्ही बघितली असतील; तर लक्षात घ्या, ती फुलपाखरं नसून तो 'पतंग' असतो. पतंग आणि फुलपाखरू यातील मुख्य फरक म्हणजे फुलपाखरं दिवसा उडतात तर पतंग रात्री उडतात. पतंगाच्या शरीरावर किंचित लव असते. आपले पंख पसरून पतंग विश्रांती घेतो तर फुलपाखरू पंख एकमेकांना चिकटवून ठेवते. पतंगाची स्पर्शसूत्रे ताठ असून फुलपाखराची किंचित वळलेली असतात.

फुलपाखराप्रमाणे आपल्याला गवतावर उड्या मारणारे टोळ–नाकतोडेसुद्धा नेहमी दिसतातच. इतर कीटकांच्या मानाने नाकतोड्याचे शरीर अत्यंत कठीण असते. जगभरात नाकतोड्याच्या नऊ हजार जाती आढळतात. नाकतोडा सुमारे चार से.मी. लांब असतो. तो आपल्या उंची पेक्षा वीसपट लांब उडी मारू शकतो.

ओलसर भिंती, शेवाळे यांवर तुम्ही कधीतरी गोगलगाय नक्की पाहिली असेल. गोगलगायी सरपटताना एक प्रकारचा चिकट संरक्षक स्राव सोडतात. हा स्राव इतका मजबूत असतो की गोगलगाय कोणतीही इजा न होता ब्लेड च्या धारेवरून देखील प्रवास करू शकते. तिच्या डोक्यावर दोन स्पर्श सूत्रे असतात. त्यावर तिचे डोळे असतात. गोगलगायीच्या जीभेवर उंचवटे असतात. त्यांचा वापर करून तीअन्न खाते.



पावसाळ्यात डबक्यांजवळ बरेचदा



सजल श्याम घन गर्जत आले, बरसत आज तुषार। झाला आता जीवनमय संसार॥

॥ **अधिक जाणून घ्या : रणबक्षी लॅब** – स्थापना –१९६१, संस्थापक – भाई मोहनसिंग – फार्मास्युटिकल्स क्षेत्र ॥




प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली.

आपल्याला बेडूक दिसतो. बेडकाच्या त्वचेत अनेक विषग्रंथी असतात. बेडकाची उडी फार लांबपर्यंत जाऊ शकते. ते पाण्याखाली कित्येक तास राहू शकतात. आणि गांडूळासारखे त्वचेवाटे श्वास घेऊ शकतात. बेडकाची त्वचा ओलसर असते. ती कोरडी पडल्यास बेडकाला मरण येते. म्हणून पावसाळा संपल्यावर बेडूक ओलसर मातीत जाऊन निपचित पडून राहतो. काही बेडूक गोठलेल्या अवस्थेत बराच काळ राहू शकतात.

पावसाळ्यात साचलेल्या पाण्यामुळे डासांची संख्याही वाढीस लागते. साचेलेल्या पाण्यात डासाची मादी अंडी घालते व फुलपाखराप्रमाणे १) अंडं २) अळी ३) कोश ४) डास अशा अवस्थेत त्याची वाढ होते.

डासांना दोन स्पर्शसूत्रे असतात. त्यांचे पाय अत्यंत सडपातळ असतात. त्यांचे डोळे संयूक्त प्रकारचे असतात. रक्त व वनस्पतीतील द्रव शोषण्यास एक सोंड असते. त्यांचा आकार एक सेमी पेक्षाही वाढू शकतो.




डासावर लव असेल तर तो नर असतो. नर डास वनस्पतीतील द्रवावर गुजराण करतात तर मादी इतर प्राण्यांचे रक्त शोषून घेते. डास निळ्या रंगाकडे सर्वात जास्त आकर्षित होतो. गवती चहा डासांच्या पायांसाठी अपायकारक असतो. त्यामुळे ते गवतीचहा असलेली जागा नेहमी टाळतात. डासांमूळे हिवताप, डेंग्यु असे गंभीर आजारही होतात.

तर मित्रांनो, या पावसाळ्यात अशा छोट्या मित्रांना खुशाल समजून घ्या ! पण तितकेच सावधही राहा !

★★★

– **कु. हर्षदा काळे** (इ. १० वी)
अक्षरनंदन प्रशाला, पुणे

---



## वृक्षांची किमया

अरे मानवा, अरे मानवा, मारू नको मला
किती वाटते वाईट, कसे सांगू तुजला ।।

तूच जर केले असे वृक्षांचे शोषण
सांग कसे होईल, या पृथ्वीचे पोषण ।।

मी देतो तुम्हाला गोड-गोड फळांचा मेवा
कोमल छाया देऊन, करतो आईप्रमाणे सेवा ।।

माझ्यामुळे भागवल्या जातात तुमच्या गरजा
मग कशासाठी देता मला, अशी मरण्याची सजा ।।

वृक्षांमुळेच तुमचे जीवन बनते सुंदर
म्हणूनच थांबवा वृक्षतोड, नि करा माझी कदर ।।

म्हणूनच म्हणतो झाडे लावा, झाडे जगवा
स्वच्छ सुंदर आणि सुखी जीवन फुलवा ।।

– **कु. कल्याणी महाजन** (इ. ९ वी)
प्लॉट क्र. के.-१४६, बजरंग कॉलनी,
एन -७, सिडको, औरंगाबाद

***चित्रकार :*** *मेघना साठे*

**श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे। क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे।।**



।। **अधिक जाणून घ्या : रिलायन्स समूह** – स्थापना – १९६६, संस्थापक – धीरूभाई अंबानी – ऊर्जा, टेक्सटाईल, दूरसंचार क्षेत्र ।।

**प्रायोजक - संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.**

# अनोखे कृषिपर्यटन

**– चि. रुचिर कुलकर्णी**

'वर्ष २०१४ ची सुरुवात काहीतरी वेगळी व्हावी,' असा माझा मनात विचार चालू होता. नाताळपासूनच सगळीकडे ख्रिस्ती नववर्षाच्या उत्सवाची जोरदार तयारी सुरू होती.

३१ डिसेंबरच्या दोन-तीन दिवस आधी वर्तमानपत्र चाळत असताना मला कृषिपर्यटनाची जाहिरात दिसली. उत्सुकतेने मी अन्तर्जालावर या कृषिपर्यटनाची *वेबसाईट* शोधून माहिती मिळवली. माहितीनुसार हा कृषिपर्यटनाचा प्रकल्प श्री. पांडुरंग तावरे राबवत आहेत हे समजले. हा प्रकल्प बारामती तालुक्यातील पळशी गावात आहे. नववर्षाची सुरुवात आपण या ठिकाणी करायचा बेत मी आखला. कारण आई-बाबांकडून या कल्पनेला हिरवा झेंडा मिळाला होता. मग आम्ही ३१ आणि १ अशा दोन दिवसांसाठीचे तिथे आरक्षण केलं. ३१ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १ वाजता पळशी गावात आम्ही प्रकल्पाच्या ठिकाणी पोचलो. पुणे ते पळशी हा प्रवास साधारण दोन -अडीच तासात पूर्ण होतो. तिथं गेल्यावर आपलं स्वागत फुलांचा हार व मानाचा टिळा लावून केलं जातं. आम्हाला आमच्या खोल्या दाखवल्यावर ताजेतवाने होऊन आम्ही जेवायला गेलो. ३ प्रकारच्या भाज्या, उसळ, भाकरी, कोशिंबीर, आमटी, भाताचा प्रकार, ताक आणि गव्हाची खीर असं जेवण, आम्हाला तृप्त करून गेलं. भरपेट जेवण झाल्यावर आम्हाला थोडा वेळ विश्रांतीसाठी दिला होता. आमच्याबरोबर अजून दहा-बारा जणांचा एक गट होता.

संध्याकाळी सुमारे ४ वाजता आम्ही तावरे सरांबरोबर त्यांच्या गावातले ऊसाचे गुऱ्हाळ पाहिले. तेथे पोहोचताच मला ऊसाचा ढिग दिसला. गुऱ्हाळाच्या आजूबाजूला मळीचा उग्र वास येत होता. गुऱ्हाळात ऊसातील रस काढणारी मोठी यंत्रं पाहिली. ऊसातून काढलेला रस कढईत उकळून तो साच्यात कसा घालतात, तेही बघितलं. काकवीचा आस्वाद घेतला. हे सर्व पाहून, सरांबरोबर महाराष्ट्रातील सर्वात जुन्या साखर कारखान्यांपैकी एका



कृषिपर्यटन प्रकल्प – पळशी

***ख्रिस्ती नववर्षाचे स्वागत करण्यासाठी जंगी बेत आखले जातात. पण आपल्या मित्राने नववर्षाच्या निमित्ताने कृषिपर्यटनामध्ये सहभागी होऊन आपल्या ग्रामीण जीवनशैलीची, संस्कृतीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. शहरात राहणाऱ्या मुलांना असे अनुभव क्वचितच घेता येतात...***

कारखान्याला आम्ही भेट दिली. साखर कारखान्याच्या प्रवेशद्वाराजवळ ऊसाने खचाखच भरलेले ट्रॅक्टर, बैलगाड्या यांच्या लांबच लांब रांगा दिसल्या. कुतूहल म्हणून ट्रॅक्टरमधील एका शेतकऱ्याला त्याबाबत मी विचारणा केली; तेव्हा साखर कारखान्याला ऊस विकण्यासाठीची ती रांग होती, असं मला समजलं. 'कधी कधी कारखान्यात प्रवेश करायला दोन-दोन दिवस रांगेत तिष्ठत बसावं लागतं. जसा वेळ जाईल तसं ऊन्हामुळं ऊसाचं वजन कमी होत जातं. ट्रॅक्टरचं भाडंही परवडत नाही शिवाय ऊसाला रास्त भावही मिळत नाही.' अशा काही अडचणी एका शेतकरीदादानं बोलून दाखवल्या. माझ्यासाठी हे सारंच नवं होतं. गोड साखरेमागचं कटू सत्य काही प्रमाणात माझ्यासमोर येत होतं. ऊसाच्या मळीचा वास कारखान्याच्या आजूबाजूला फार येतो. या कारखान्यात साखर बनवायच्या अनेक पातळ्या आहेत. मोठ्या यंत्रात ऊसाला *क्रश* करून रस काढतात. तो रस बारा वेळा गाळून घेतला जातो. पुढे त्या रसाला अनेक प्रक्रियांतून जावं लागतं. काही प्रक्रिया प्रचंड तापमानामुळे आपण पाहू शकत नाही. कारखान्यात तयार झालेली ताजी, गरम, तांबूस रंगछटा असलेली साखर खायला देऊन



**बाहेर सारखी श्रावण सर कोसळे। हिरवळून बहरले, सळसळती हे मळे॥**

॥ **अधिक जाणून घ्या : पूनावाला ग्रूप** – स्थापना–१९६६, संस्थापक – सायरस पूनावाला, विविध लसीकरणाचे संशोधन क्षेत्र ॥



**प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.**


शेततळं

तेथील लोकांनी आमचं तोंड गोड केलं. रसापासून ते साखरेचे विविध प्रतवारीनुसार केलं जाणारं *पॅकिंग* बघितलं. गुऱ्हाळ व कारखाना पाहून आम्ही प्रकल्पावर परतलो.

३१ डिसेंबरची रात्र असल्यामुळे पळशी गावातील सगळी मंडळी जोशात होती. रात्री आमच्यासाठी तावरे सरांनी तेथील गावकऱ्यांचा खास भजनाचा कार्यक्रम ठेवला होता. भजनाची मस्त मैफिल झाल्यावर आम्ही गावरान जेवणाचा आस्वाद घेतला. थंडी भरपूर असल्यामुळे आम्ही सगळे शेकोटी पेटवून त्याच्या आजूबाजूला बसलो. शहरापासून दूर असल्यामुळे येथे वातावरण प्रदूषणविरहीत व स्वच्छ होतं. आकाशात विस्तीर्ण पसरलेलं चांदणं दिसलं. त्यानंतर सुमारे तासभर आम्ही आकाशदर्शनाचा आनंद लुटला. त्यानंतर ग्रामीण पेहराव करण्याची घोषणा झाली. सगळे पुरुष झब्बा, धोतर आणि फेटा तर बायका नऊवारी साडीत! या पेहरावात सगळ्यांनी मनसोक्त फोटो काढून घेतले. हे सगळं करेपर्यंत बारा वाजले. त्याच वेषात आम्ही एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

दुसऱ्या दिवशी पहाटे कोंबड्याच्या आरवण्याने आम्हाला जाग आली. सकाळी वातावरण गार असल्यामुळे आम्ही आजूबाजूचे मळे पाहून आलो. सकाळी सकाळी मोठाच फेरफटका झाल्यामुळे भूक भरपूर लागली होती. पोटभर नाष्टा करून आम्ही पतंग उडवायच्या तयारीला लागलो. पतंग उडवायचा माझा पहिलाच अनुभव होता. तेथील लोकांनी कन्नी बांधण्यापासून ते पतंग काटण्यापर्यंत सगळं आम्हाला दाखवलं.

मनसोक्त पतंग उडवल्यावर आमच्यासाठी बैलगाडी ठरवली गेली. त्या बैलगाडीत बसून आम्ही शेत बघायला गेलो. त्यांच्या २०-२५ एकर जमिनीत मुख्यत: आंब्याची, सागाची, हरबऱ्याची, ऊसाची शेती होती. त्याचबरोबर मिरची, भेंडी, कांदा इ.ची लागवड केली होती. या मोठ्या शेतांना पाणी पुरवण्यासाठी त्यांनी भव्य शेततळं बांधलं होतं. काही ठिकाणी पिकाची कापणी कशी केली जाते हे शेतकऱ्यांनी दाखवले. कांद्याच्या शेतात कांदापातीपासून विळ्याच्या साहाय्याने मी कांदा वेगळा करायला थोडीफार मदत केली. शेतातून परतेपर्यंत दुपार झाली होती. सगळ्यांच्या पोटात कावळे ओरडत होते. सगळे दाबून जेवलो. जेवताना मला शेतावर पाहिलेल्या शेतकऱ्यांच्या कष्टांची जाणीव झाली. या प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावातल्या लोकांना रोजगार मिळतो. त्यांच्यातील कलांना वाव मिळतो. शेतकऱ्यांनी पिकवलेला भाजीपाला थेट आपल्याला विकत घेता येतो त्यामुळे त्यांना योग्य भावदेखील मिळतो.




कितीही नाही म्हटलं तरी परत जाण्याची वेळ आली होती. खरंच, हे दोन दिवस कसे आनंदात गेले; ते मला कळलंच नाही. या दोन दिवसांत मी भरपूर काही नवीन शिकलो. कृषिपर्यटनाच्या निमित्ताने काही अंशी ग्रामीण जीवनाची झलक मला अनुभवायला मिळाली. पर्यटन म्हणताना ते आनंददायी कसं होईल; असंच त्याचं संयोजन होतं. पण यापुढे ग्रामीण संस्कृती, जीवनशैली, तेथील लोकांच्या समस्या अधिक तपशीलात जाणून घेण्याचा, या निमित्ताने माझा प्रयत्न राहील.

★★★

– **चि. रुचिर कुलकर्णी** (इ. १०वी)
सी २०४, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे 9

**चुकीची दुरुस्ती –** सौर फाल्गुन / मार्च २०१४ च्या अंकात **पान क्र. ११** वरील तळटीपेतील ‘विजयालक्ष्मी पंडित’ यांच्या नावासमोर ‘मुत्सद्दी राजकारणी व युनायटेड नेशन्सच्या सर्व सामान्य संसदेच्या पहिल्या महिला अध्यक्षा’ असे वाचावे. मजकूरातील चूक **श्री. कौशिक देसाई** (गोवा) यांनी निदर्शनास आणून दिल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.




**गिरिकंदरे बुडाली आभाळ तोलताना। वनराई मौन झाली, पाऊस झेलताना।।**



।। **अधिक जाणून घ्या : एस्सार समूह** – स्थापना – १९६९, संस्थापक – शशी, रवी रूईया – ऑईल, स्टील क्षेत्र ।।

**प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, नागपूर.**

# त्यावेळी मी आत्मविश्वासाने बोलायला हवं होतं !



**– चि. प्रथमेश डोळे**

***संवाद साधता येणं हे खरोखरीच एक कौशल्य आहे. कधी परिस्थितीचा, आजूबाजूच्या वातावरणाचा आपल्यावर ताण येतो. कुठल्याही प्रकारचा संवाद साधताना, मुलाखत देताना, सादरीकरण करताना दडपण घेतलं नाही तर आपला आत्मविश्वास बळावतो. आपण प्रभावी संवाद साधू शकतो...***

मित्रांनो, हा प्रसंग आहे मागील वर्षीच्या उन्हाळी सुट्टीतला. म्हणजे मी जेव्हा इयत्ता सातवीची वार्षिक परीक्षा देऊन इ. आठवीमध्ये प्रवेश करत होतो ना, तेव्हाचा... मला संगीत, नाट्य, अभिनय, कथा लेखन, कविता करणे, चित्र काढणे इ. कलांची विशेष आवड आहे. आमच्या गावी म्हणजेच कराडला जेव्हा बालकुमार साहित्य संमेलन झालं; तेव्हा सर्वांसमोर नाट्यछटा सादर करण्याची मला संधी मिळाली. त्यानंतर कराडलाच शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित 'जाणता राजा' या महानाट्याचे प्रयोग शिवाजी स्टेडियम येथे झाले, त्या महानाट्यातही 'बाल शिवाजी' ही संस्मरणीय भूमिका करण्याची संधी मिळाली. त्यानंतरच्या वर्षी कराडलाच महाराष्ट्र शासनाचे 'बालनाट्य प्रशिक्षण शिबिर' झाले. त्या शिबिरातही मला अनेक गोष्टी शिकायला, अनुभवायला मिळाल्या अन् मी नाट्यक्षेत्राच्या अगदी जवळ गेलो. अनेक मोठमोठे कलाकार जवळून पाहायला मिळाले. त्यांच्याकडून बरेच काही मार्गदर्शनपर शिक्षण मिळाले आणि माझा आत्मविश्वास वाढत गेला.

याचबरोबर इ. चौथीमध्ये मला मिळालेली शिष्यवृत्ती, इ. पाचवीमध्ये इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात मिळालेला प्रथम क्रमांक आणि विविध आकाशवाणी केंद्रांवरून माझे प्रसारित होणारे अनेक कार्यक्रम, या सर्वांचा उपयोग माझा आत्मविश्वास वाढण्यासाठी झाला. दरम्यानच्या काळातच '*Centre for Cultural Resources and Training (CCRT)* दिल्ली' या संस्थेच्या कलाक्षेत्रातील शिष्यवृत्तीविषयी माहिती आम्हाला मिळाली. *CCRT* साठी देशातून ५२० विद्यार्थ्यांची निवड होते. त्यातील १५० जागा पारंपरिक कलाकारांच्या मुलांसाठी राखीव असतात आणि उर्वरित जागा इतर कलाकारांसाठी शिल्लक राहतात. ही शिष्यवृत्ती आपण मिळवायचीच असा मी मनाशी निश्चय केला. त्यानुसार मी माझा अर्ज सर्व माहितीसह संस्थेला पाठवून दिला. माझी सातवीची शिष्यवृत्तीची आणि वार्षिक परीक्षा झाली आणि सुट्टीत फिरावयास कोठे जायचे असा मनात विचार चालू असताना एके दिवशी *CCRT* च्या माझ्या मुलाखतीची तारीख जाहीर झाली '२१जून'. मी ज्या गोष्टीची अगदी आतुरतेनं वाट पाहात होतो, तो क्षण अगदी जवळ येऊन ठेपला.

मला खूप दिवसांपासून मुंबई पाहाण्याची तीव्र इच्छा होती आणि मुलाखत मुंबई येथे असल्याने माझ्या आनंदात आणखी भर पडली. अगोदरच मामाने महालक्ष्मी एक्स्प्रेस रेल्वेची तिकिटे बुक केली. मुलाखतीसाठी मुंबईला जाण्याची जय्यत तयारी चालू होती. टी.व्हीवर मुंबईचा कोणताही भाग दाखवला, की आपण येथे जायचेच, असे मनात यायचे.

२० जूनचे रिझर्वेशन होते. दिवस उजाडला. अनेकांनी माझ्या मुलाखतीसाठी शुभेच्छा दिल्या. रात्री ११ वाजता कराडहून आमचा मुंबईच्या दिशेनं रेल्वेचा प्रवास सुरू झाला. जाताना प्रत्येक स्टेशनची नोंद मनात साठवताना झोप कधी लागली ते कळलेच नाही. सकाळी जाग आली ती मामाच्या हाकेनं, 'चल उठ, आपण आता मुंबईच्या जवळ आहोत.' एरवी उठायला आळस करणारा मी 'मुंबई' म्हटल्यावर ताडकन् उठून बसलो. कुतूहलानं मुंबईतील प्रत्येक परिसर न्याहाळू लागलो. मुंबई सेंट्रलला उतरून तेथून जवळच एका लॉजमध्ये आम्ही खोली घेतली. तेथे थोडे ताजेतवाने झालो आणि पाच मिनिटाच्या अंतरावर असलेलं मुलाखतीचं ठिकाण शोधून आलो. दुपारी दोन वाजता मुलाखत होती. म्हणून जेवण उरकून थोडा आराम करून दुपारी दीड वाजता



पाऊस आला वारा आला, रान लागले नाचू। थेंब टपोरे गोरे गोरे, भरभर गारा वेचू।।

।। **अधिक जाणून घ्या : वेदांता रिसोर्सेस** – स्थापना – १९७६, संस्थापक – अनिल अग्रवाल – स्टील क्षेत्र ।।



**प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटेक्ट प्रा. लि., पुणे.**

मुलाखतीच्या ठिकाणी जाऊन पोहोचलो.

ती एक अंध मुलांची शाळा होती. 'नंबरनुसार बोलावणं येईल. थोडं थांबा,' अशी तेथील लोकांनी सूचना केली. माझ्याबरोबर माझ्यासारखेच अनेक विद्यार्थी होते. एकमेकांशी गप्पा मारता मारता लक्षात आले, की त्यातील काही मुले बऱ्याच चित्रपटात बालकलाकार म्हणून काम करत होते. त्यामुळे माझी थोडी धडधड वाढू लागली. माझा मुलाखतीसाठी दुसरा क्रमांक होता. माझ्या गटाबरोबरच इतर गटांच्यासुद्धा मुलाखती चालू होत्या. काही मोठी मुले मुलाखत देऊन बाहेर पडताना ओक्साबोक्शी रडताना दिसली. त्याचा माझ्या मनोधैर्यावर परिणाम होत होता. आई-बाबा, मामा धीर देत होते. वरवर पाहता मी शांत दिसत होतो; परंतु आतून मन:स्थिती थोडी बदललेली होती. माझा क्रमांक दुसरा होता; पण अचानक माझा नंबर पुकारला गेला. प्रथम क्रमांकाचा विद्यार्थी हजर नसल्यानं अचानक मला आत बोलावलं. मी थोडासा गोंधळलो. परीक्षकांनी नाव विचारलं; पण जरा चाचपडतच मी नाव सांगितलं. त्यांना ऐकू आलं नाही. त्यांनी पुन्हा नाव विचारले. त्यानंतर सादरीकरण करण्यास सांगितले. मी संभाजी राजांचं स्वगत आणि मी स्वत: तयार केलेली नाट्यछटा सादर केली. परंतु इतर अनेक ठिकाणी मी ज्यापद्धतीने सादरीकरण करत होतो त्याप्रमाणे मी तिथे सादरीकरण करू शकलो नाही.




माझा आत्मविश्वास तिथे कमी पडला; हे मला जाणवलं. पण मी पुन्हा प्रयत्न करणार. जिद्द आणि चिकाटी सोडणार नाही असा निश्चय केला. माझ्या आई-बाबांनी, मामानं मला खूप समजावलं. मला धीर, प्रोत्साहन दिले. खूप मजा केली; पण पुन्हा आत्मविश्वासाने उभे राहण्याचा निश्चय करून, मुंबईदर्शन करून स्वगृही परतलो.

मित्रांनो, त्यानंतर एका मराठी चित्रपटामध्ये मला छोटीशी भूमिका मिळाली. तरीही असं वाटतं, की मुंबईतील मुलाखती दरम्यान सहविद्यार्थ्यांचे अनावश्यक दडपण मी घेतले नसते, तर आज मी माझ्या ध्येयापर्यंत नक्कीच पोहोचू शकलो असतो. ★★★

**चि. प्रथमेश डोळे** (इ. ९वी)
२०४ 'अ' शनिवार पेठ, दत्त चौक,कराड, जि. सातारा



## प्रतिसादी वाचकवीर व्हा... ४

### हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या-त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत असतो. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आंनद मिळवाल, असा विश्वास आहे.

१. 'आनंदाने खेळूया' या नाट्यछटेप्रमाणे तुम्हाला भावलेल्या एका विषयावर चटपटीत संवाद लिहून छात्र प्रबोधनकडे पाठवा.
२. 'साथी हाथ बढाना अर्थात श्रमदान' या लेखात युवकांनी कोणत्या गावात व कुठल्या प्रकारे श्रमदान केले?
३. कृषिपर्यटनाच्या लेखाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना कुठल्या समस्यांना तोंड द्यावे लागते?
४. 'वृक्षांची किमया' या कवितेतून 'वृक्ष आपल्याला कशा प्रकारे मदत करतो' हे सांगितले आहे?
५. या अंकात कुठल्या पुस्तकाचा परिचय करून दिला आहे? त्याचा मराठीत अनुवाद कोणी केला आहे?
६. मुखपृष्ठावरील चित्रास कवितेच्या समर्पक ओळी सुचवा.

**आला पाऊस मातीच्या वासात गं। मोती गुंफित मोकळ्या केसात गं।।**


।। **अधिक जाणून घ्या : जी. एम. आर. समूह** – स्थापना–१९७८, संस्थापक – गांधी मल्लिकार्जुन राव – इन्फ्रास्ट्रक्चर, ऊर्जा क्षेत्र।।
**प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.**

# आनंदाने खेळूया !

**–चि. गुंजन मोहकार**



**पूर्वी उन्हाळ्याची सुट्टी लागताच मुलं खेळायच्या मागे असत. ते दिवस–रात्र काही बघत नव्हते; पण आत्ताची मुलं मैदानी खेळांपेक्षा संगणकावर खेळ खेळत बसलेले दिसतात. याचीच खंत आपल्या मित्राने बॅट, बॉल आणि फुटबॉल यांच्या संवादातून मांडली आहे.**

*(उन्हाळ्यातील सुट्टीचे दिवस. तापलेलं कडक ऊन. भर रस्त्यावरून ये–जा करणाऱ्या वाहनांची वर्दळ. हॉर्नचे कर्कश आवाज कानात घुमत होते. झाडाखाली कोणीतरी तिघेजण विश्रांती घेत होते. हे तिघे म्हणजे बॅट, बॉल आणि फुटबॉल ! तापलेल्या उन्हात झाडाच्या सावलीत बसून हे तिघं अशी कुठली गहन चर्चा करत होते? बघूया तरी. तेवढ्यात एकाचा आवाज कानी पडला)*

**बॅट** – अनर्थ, केवढा मोठा अनर्थ ! कधीकाळी दुपारचं कडक ऊन झेलत मुलांच्या आनंदासाठी त्यांच्याबरोबर खेळणारे आपण आज स्वस्थ, निवांत बसलो आहोत!!!

**बॉल** – उंच आकाशात झेप घेणारा मी; आज जमिनीवर लोळत पडलो आहे. हे कटू सत्य माझ्या गळी उतरतच नाही.

**फुटबॉल** – स्वस्थ बसून राहणं, माझ्या रक्तातच नाही; पण याला उपाय तरी काय??

**बॅट** – खरंच, फुटबॉलदादा, आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाल्यापासून ही मुलं संगणकावरील खेळ खेळण्यातच मग्न झाली आहेत. आता त्यांच्यासाठी आपली कवडीभरही किंमत उरलेली नाही.

**बॉल** – मुलांना आनंद मिळावा म्हणून आपण किती कष्ट उपसतो. त्या कष्टांचं काहीच मूल्य नाही का?

**फुटबॉल** – मुलांना खेळण्याचा आनंद मिळावा म्हणून मी त्यांच्या लाथादेखील सहन करतो आणि मनाला सतत समजावतअसतो की, आपल्याला दु:ख मिळत असलं, अंग खिळखिळं होत असलं, तरी मुलांना मिळणारा आंनद महत्त्वाचा !!

**बॉल** – क्रिकेट खेळताना मी वेडावाकडा बॅटवर आदळायचो. संपूर्ण अंगभर वेदना जाणवायच्या. वेदनांमुळे आलेले अश्रू मी उंच आकाशातून परत जमिनीवर येण्याआधीच पुसून टाकत असे. का? तर फक्त मुलांच्या आनंदासाठीच...

**बॅट** – खरंच, तंत्रज्ञानाच्या अधीन होतानाच या मुलांनी आपल्याला त्यांच्यापासून फार दूर लोटलं.(फुटबॉल घरंगळतच थोडा पुढे येतो.)

**फुटबॉल** – म्हणून तर उन्हाळ्यातील सुट्टी संपली तरी आपली खबरबात विचारायला ही मुलं आली नाहीत. (डोळ्यांतील अश्रू पुसत.)

**बॉल** – खरंच दादा, पण या मुलांनी आपले महत्त्व विसरून चालायचे नाही. आपण केवळ यांना आनंद, उत्साह, जोश प्रदान करत नाही, तर त्याबरोबरच त्यांचं

ऊन पाऊस झेलता, बीज अंकुरत जाते। अन् बैलांच्या श्रमाला, फळ सुगीतून येते।।

।। **अधिक जाणून घ्या : बायोकॉन** – स्थापना – १९७८, संस्थापक – किरण मुजूमदार – बायोफार्मा क्षेत्र ।।



प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.



स्वास्थ्य उत्तम राखतो. त्यांना चपळ बनवतो, काटक बनवतो.

**बॅट** – त्यांना शारीरिक स्वास्थ्याबरोबरच उत्तम मानसिक स्वास्थ्यही देतो, त्यांच्यात संकटं झेलायची ताकद निर्माण करतो. हे सगळं केवळ मैदानी खेळामुळे शक्य आहे; त्या नवीन बैठ्या संगणकावरील खेळांमुळे नव्हे !!

**फुटबॉल** – खरंच; 'जुने ते सोने' हे आता मुलांना पटवायची वेळ आली आहे. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि प्रगतीसाठी आपणच महत्त्वाचे आहोत, हे मुलांनी ओळखायला पाहिजे.

**बॉल** – आणि हो, परत एकदा आपल्याला स्वीकारून...

**बॅट** – स्वत:चं हित साधलं पाहिजे. (उत्साहाने, नवी उमेद मनात घेऊन फुटबॉल म्हणतो...)

**फुटबॉल** – त्यासाठी आपण यथाशक्ती प्रयत्न करणं गरजेचं आहे. (तेवढ्यात मुलांचा घोळका मैदानाच्या बाजूने जाताना दिसतो. त्यांना पाहून ...)

**बॉल** – चला तर मग, बॅट आणि फुटबॉल या कामाला आत्ताच सुरुवात करूया.




**फुटबॉल** – We can and we will do it *(फुटबॉल घरंगळत मुलांजवळ जातो. बॅट बॉलला उंच आकाशात टोलवते. उंच आकाशातील बॉल एका मुलाच्या ओंजळीत पडतो. मुले बॅटकडे दृष्टी फेकतात आणि स्मितहास्य करत क्रीडांगणात येतात. थोड्याच वेळात मैदानावर मुलं खेळतात. मुलांचा आवाज आसमंतात दुमदुमतो.)*

**बॅट, बॉल, फुटबॉल** – चला, सुरुवात तर चांगली झाली. आता ना कुठली चिंता, ना कुठली खंत, मुले आणि आमच्या नात्याचा कधी होणार नाही अंत.

★★★

– **चि. गुंजन मोहकार** (इ. ९ वी)
बालशिवाजी माध्यमिक शाळा, जठारपेठ, अकोला
***चित्रकार** : दर्शना मालुसरे*

## ✻ विशेष कौतुक ✻

सौर चैत्र/एप्रिल २०१४ या 'छात्र प्रबोधन' मधील **संवादात** मा. संपादकांनी **'गारपीटग्रस्तांना शैक्षणिक मदत करण्यासाठीचे'** आवाहन केले होते. या आवाहनास प्रतिसाद म्हणून **चि. ऋत्विज जोशी, कुडाळ** या आपल्या सभासद मित्राने एक महिना औषधांच्या दुकानात काम करून श्रमदान केले. त्यातून त्याची रु. ५००/– ची कमाई झाली. ती कमाई त्याने गारपीटग्रस्तांच्या मदतीसाठी 'छात्र प्रबोधन'कडे सुपूर्द केली.

त्याच्या या स्तुत्य कामाबद्दल आपल्या सर्वांतर्फे **त्याचे खूप खूप कौतुक व अभिनंदन !!**

अरे अरे पावसा, नको कोसळूरे असा। उजळू दे जरा नभ, सूर्य दिसू दे लालसा।।



।। **अधिक जाणून घ्या : आर. पी. जी. ग्रुप** – स्थापना – १९७९, संस्थापक – रामनाथ गोएंका – पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर, आयटी क्षेत्र ।।

**प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.**

# विकसता विकसता विकसावे...

***'छात्र प्रबोधन' मासिक आणि त्याभोवती असलेल्या उपक्रमातून आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याची, फुलवण्याची-खुलवण्याची आपल्याला संधी मिळते. मे महिन्यातील सुट्टीत 'छात्र प्रबोधन'तर्फे अनेक उपक्रम आयोजित केले जातात. जोडीकार्य, कार्यानुभव, अभिवाचन कार्यशाळा यांसारख्या उपक्रमातून आपला आत्मविश्वास, अभिव्यक्ती कौशल्यं वाढीस लागतात. आपण मोठ्ठं, समृद्ध झाल्याची जाणीव होते. या उपक्रमात सहभागी झालेल्या आपल्या काही मित्र-मैत्रिणींनी अशाच प्रकारच्या भावना व्यक्त केल्या आहेत. वाचूया त्यांचे हे बोलके अनुभव...***

## जोडीकार्य

**– कु. सानिका कुलकर्णी**





उन्हाळ्याची सुट्टी लागली आणि मी एखादया आगळ्यावेगळ्या शिबिराचा शोध घेत होते. मग मला ज्ञान प्रबोधिनीतील 'छात्र प्रबोधन'मधून जोडीकार्य उपक्रमाबद्दल कळलं. 'जोडीकार्य' म्हणजेच जोडीनं केलेलं कार्य. आता कार्य म्हटल्यावर परत रटाळपणे काम करायचं असं तुम्हाला वाटत असेल; तर ते तसं अजिबात नाही. आपल्याला 'छात्र प्रबोधन'मधल्या ताई सात आव्हानात्मक कामं सांगतात. ती कामं आपण आपल्या मैत्रीण किंवा मित्राबरोबर जोडीनं पूर्ण करायची. दोघांनी मिळून ही कामं पूर्ण केली, की मग तीन दिवसाची साहस सहल. 'आव्हानात्मक' शब्द ऐकल्यावरच ठरवलं की ही सात कामं पूर्ण करूनच दाखवायची. ठरवल्याप्रमाणे मी आणि माझी मैत्रीण मंजिरी हिनं ही कामं पूर्ण केली. जोडीनं काम करताना आम्हाला खूप मजा आली.

पहिल्यांदा आम्हाला १०० ₹ चा डी.डी. काढायला सांगितला होता आणि तोही कोणा मोठ्यांची मदत न घेता. मग बँकेत जाऊन, डीडी कसा काढायचा याची चौकशी करून आम्ही डी. डी. काढला. तेव्हाच आम्हाला पहिलं काम दिलं गेलं.

पहिलं काम होतं **विक्रीकार्य**. ज्यामध्ये आम्हाला फुलांचे गजरे किंवा एखादं सरबत स्वत: बनवून एखाद्या अनोळखी ठिकाणी विकायचं होतं. त्यामुळे आमचं विक्री कौशल्य दिसून येणार होतं. आम्ही लिंबू सरबत विकायचं ठरवलं. सगळा अंदाज घेऊन २५ ग्लास लिंबू सरबत बनवलं मग ते सरबत, ग्लास घेऊन आम्ही चतु:श्रृंगी मंदिराच्या पायथ्याशी जाऊन बसलो. सकाळी दहा वाजता गेलो होतो. तेव्हा डोंगरावर फिरायला जाणारे, देवीच्या दर्शनाला आलेले लोकं, उन्हातून खाली उतरल्यावर दमून ते थंडगार सरबत घेतील असा आमचा अंदाज होता. पण त्यादिवशी लोक कमी होते. आणि जे होते ते सरबत घेतच नव्हते. आता मात्र आमची सहनशक्ती संपली. शेवटचा प्रयत्न म्हणून थोड्या जिद्दीनं व चिकाटीनं आम्ही येणाऱ्या लोकांना हाका मारून बोलवायला सुरुवात केली. तेव्हा मात्र काहींनी आमच्याकडून सरबत घेतलं. काही जण 'नाही' म्हटल्यावर खूप राग यायचा, चिडचिड व्हायची. पण तरी चिकाटीने आम्ही असे पंचवीसच्या पंचवीस ग्लास प्रत्येकी १० रु. प्रमाणे विकले. आम्हाला थोडा नफा झाला. त्यामुळे आम्ही खूप खुष झालो. अशाप्रकारे पहिलं काम चिकाटीनं पार पडलं.

दुसरं काम आम्हाला दिलं; ते म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील तीन शाखा म्हणजेच *Science*, *Arts* आणि *Commerce* यांचे प्राध्यापक शोधून त्यांची **मुलाखत घेण्याचे**. प्राध्यापकाकडून त्या तीन शाखांबद्दल माहिती मिळवायची होती. हे वाटत होतं तेवढं सोप्पं नव्हतं. कारण प्राध्यापक शोधून त्यांच्या वेळेनुसार काम होणार होतं. त्यामुळे 'तीन दिवसात होईल', असं वाटलेल्या कामाला आम्हाला दोन आठवडे लागले. परंतु आमच्या सर्व शंका दूर होऊन



**आला पाऊस आला पाऊस, आल्या मोठ्या गारा। स्वच्छ पांढरे अंगण झाले, रस्ता भरला सारा।।**

।। **अधिक जाणून घ्या : व्हिडीओकॉन** – स्थापना – १९७९ संस्थापक – वेणूगोपाल धूत – होम अप्लायन्सेस क्षेत्र ।।



**प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.**



प्राध्यापकांकडून आम्हाला सविस्तर माहिती मिळाली.

नंतर आम्ही तिसरं काम मागितलं. तिसऱ्या कामात आम्हाला पाच वेगवेगळ्या घरी जाऊन त्यांच्या **धान्य साठवण्याच्या पद्धती** विचारायच्या होत्या. एका आजींचं खूप मोठ्ठं शेत आहे. त्या म्हणाल्या, की त्या शेतात जमिनीलगत खूप मोठा खड्डा खणतात. तो शेणानं आतून लिंपतात आणि त्यात धान्य साठवतात. त्यालाच 'कणगी' असं म्हणतात. एक मोठ्ठं पिंप घेऊन त्यात धान्य साठवतात. त्याला 'पेव' असे म्हणतात. अशाच अनेक वेगवेगळ्या पद्धती जाणून घ्यायला आम्हाला मजा आली.

आम्हाला चौथं काम **शिवाजीनगर रेल्वे स्टेशन ते आमचं घर हा रस्ता प्रमाणबद्ध अधली-मधली सर्व ठिकाणं दाखवून काढायचा होता.** काम ऐकल्यावर खूप सोप्पं वाटलं पण रस्ता प्रमाणबद्ध काढणे, सर्व ठिकाणांची माहिती करून घेणे या गोष्टींना बराच वेळ लागला. पण त्यामुळे आम्हाला रस्त्यांची माहिती झाली.

आम्हाला पाचवं काम **स्वयंपाककृती** असं होतं. ज्यामध्ये आम्हाला दोघींना मिळून एक गोड आणि एक तिखट पदार्थ बनवायचा होता.

सहावं काम आमच्या **आईवडिलांच्या मागील तीन पिढ्यांची माहिती लिहिण्याचं** होतं. हे काम किचकट असलं, तरी त्यामुळे आम्हाला आमच्या मागच्या पिढ्यांबद्दल माहिती मिळाली.

सातवं काम होतं **इव्हेंट मॅनेजमेंटचं**. ज्यामध्ये एका आजींच्या सत्तरीसाठी कार्यक्रम आयोजित करायचा होता. *डेकोरेशन, केटरिंग,* हार आणणे, करमणूक कार्यक्रम व त्याचबरोबर मांडव इ. गोष्टींचे, कार्यक्रमांचे आयोजन केले. हे सर्वात अवघड काम होतं; पण त्यामुळे आम्हाला जबाबदारीचं भान आलं. वेळेचं महत्त्व कळलं. खूप काही शिकायला मिळालं.


ही सगळी कामं करताना अनेक अडथळे आले. भरपूर कष्ट करावे लागले, अडचणी आल्या; पण त्यावर मात करून काम पूर्ण करण्यात खरी मजा येत होती. या उपक्रमातून आम्हाला खूप काही शिकायला मिळालं. जबाबदारीचं भान आलं. आमचा आत्मविश्वास वाढला. सर्वात महत्त्वाचं म्हणजे एकमेकींना सांभाळत, कधी दुसऱ्याच्या मतांचा-विचारांचा आदर करत, तर कधी आपलं म्हणणं पटवून देऊन काम कसं पूर्ण करायचं हे शिकता आलं. या कामांचा आम्ही दोघींनीही आनंद लुटला.

★★★

– **कु. सानिका कुलकर्णी** (इ. १० वी)
निर्मिती होरायझन, ए-१, फ्लॅट नं. १०३,
औंध, पुणे 411007

# अभिवाचन शिबिर

– **कु. मृण्मयी परळीकर**




**ख**रं तर 'वाचल तर वाचाल' असं म्हणतात; पण हल्ली फार वाचायला आवडतच नाही कुणाला ! आणि त्यातून ती मोठ्ठी पुस्तकं, तीही चित्रांशिवाय... किती कंटाळा येतो ते वाचायला. पण तीच पुस्तकं जर आपल्याला कोणी वाचून दाखवली तर *boring* पुस्तकंसुद्धा *interesting* वाटायला लागतात आणि वाचन जर मस्त, भावपूर्ण असेल तर संपूर्ण चित्रच डोळ्यांसमोर उभं राहतं. हे असं वाचून दाखवणं याला

**झिम्मड झाली पाऊसधारा, उदास झाले वारे। उतरून आले घन आकाशी, चिंब नाहलो सारे।।**



।। **अधिक जाणून घ्या : भारती समूह** – स्थापना–१९८०, संस्थापक – सुनील मित्तल – दूरसंचार क्षेत्र ।।

**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.**

‘अभिवाचन’ म्हणतात असं वाटत होतं; पण ३०, ३१ मे व १ जून या दिवसांत सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळात झालेल्या छात्र प्रबोधनच्या ‘अभिवाचन शिबिरा’मुळे अभिवाचन म्हणजे काय? ते का करायचं? कसं करायचं? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरं मिळाली. त्याचबरोबर ‘शिबिर समन्वयक’ म्हणून काम करण्याचा अनुभवही मिळाला.

जेव्हा ‘अभिवाचन शिबिर’ घ्यायला मी मदत करायची हे निश्चित झालं, तेव्हा उत्सुकता तर होतीच; पण दडपण जास्त आलं होतं. शिबिरासाठी पूर्वतयारी करताना छात्र प्रबोधनचे ‘बोलके अंक’ ऐकले. त्यातलं मला आवडलेलं आणि ऐकायला भारी वाटेल अशा कथा, कविता, लेख निवडले. ते निवडणं फाऽऽर कठीण गेलं. शिबिरानिमित्त छात्र प्रबोधनची बारा वर्षांची ‘संदर्भ *DVD*’ कशी वापरायची ते शिकले. आणि खरी धम्माल सुरू झाली ती शिबिराच्या पहिल्या दिवसापासून...

पहिल्या दिवशी ‘यापुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची’ या पद्याने शिबिराची सुरुवात झाली, परिचय झाला. सगळेजण साधारण माझ्याएवढेच होते. पहिल्या सत्रात मा. अंजलीताई कुलकर्णी यांनी अभिवाचनाशी आमची तोंडओळख करून दिली. त्यानंतर आम्ही अभिवाचन सादरीकरणासाठी दोन गट पाडले. ‘निसर्ग’ आणि ‘सुट्टी’हे दोन विषय आणि त्या विषयाला धरून निवडलेल्या संहिता अप्रतिम होत्या. संदर्भ DVD तून आपापल्या विषयासाठी संहिता संशोधनाचं काम अभिनव होतं. ‘निसर्ग’ या विषयाची संहिता एकत्रपणे गुंफण्याचं, निवेदन लिहिण्याचं काम करताना मला भारी वाटलं. मनात थोडी भीतीही होतीच. पहिल्या दिवशी सराव करताना आणि बोलक्या अंकातलं अभिवाचन ऐकताना ४ चे ४.३० कधी झाले ते कळलंच नाही. आणि नंतर उत्सुकता वाटायला लागली ती दुसऱ्या दिवसाची.

दुसऱ्या दिवशी आकाशवाणी उद्घोषक, निवेदक, अभिवाचक मा. प्रसाद कुलकर्णी यांच्या सत्रात ‘गद्य अभिवाचन कसं करायचं’ हे उदाहरणासहित समजलं. भुताच्या गोष्टीतील आवाजातले चढ-उतार, बदल, तांत्रिक बाबी सगळंच सरांच्या मार्गदर्शनामुळे लक्षात आलं.



मराठीसोबतच हिंदी, इंग्रजी या इतर भाषांमध्ये अभिवाचन करताना काय तयारी करायची, वाणीचे व्यायाम कसे करायचे हेही कळलं आणि आमच्या प्रश्नांच्या सरबत्तीलासुद्धा पूर्ण समाधानकारक उत्तरं मिळाली. आश्लेषाताई महाजन, मीराताई शिंदे, मृणालिनीताई कानिटकर यांनी सादर केलेला कवितांचा ‘रंग-तरंग’ हा कार्यक्रम म्हणजे कवितांच्या सादरीकरणाचा प्रत्यक्ष दाखलाच होता. त्या तिघींनी ‘वाचन’ आणि ‘अभिवाचन’ यातला फरकही आमच्या चांगलाच लक्षात आणून दिला.

तिसऱ्या दिवशी सादरीकरणासाठीचा सराव व प्रत्यक्ष सादरीकरण होतं. आम्हाला ‘अभिवाचन’ किती लक्षात आलंय याचं प्रात्यक्षिकच म्हणावं लागेल. फक्त काही तासांचा सराव आणि सर्व प्रकारच्या साहित्य प्रकारांचं अभिवाचन दोन दिवस ऐकल्यामुळे आमच्या सादरीकरणात झालेला बदल जाणवला आणि खूप आवडला. आम्हला प्रोत्साहन देण्यासाठी आमचे पालकदेखील कार्यक्रम पाहायला आले होते. शिबिरामुळे एक नवीन अनुभव मिळाला. मोठ्ठं झाल्यासारखं वाटलं. प्रत्येक सत्रात परिचय नाहीतर आभार मानणं असेल किंवा निवेदन लिहिणं, पद्य सांगणं असेल किंवा बोलक्या अंकातून अभिवाचन निवडणं यांसारख्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर मी खूप अनुभवसंपन्न झाले. मान्यवरांकडून मार्गदर्शन मिळालं, शंकांचं निरसन झालं, आधी अभिवाचनाची थोडीफार कल्पना होती; ती अधिक स्पष्ट झाली. नवीन मित्र-मैत्रिणींशी ओळख झाली, ‘छात्र प्रबोधन’च्या शिल्पाताई, शैलजाताई, सुलभाताई, चारुताताईंचा उत्साह वाढवणारा पाठिंबा मिळाला. आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे समाधान मिळलं. या



इंद्रधनुच्या झुल्याभोवती चिंब मेघ भिजलेले। अबोल हळवे सूर कोवळे, बासरीत भिजलेले ।।

।। **अधिक जाणून घ्या : निरमा** – स्थापना-१९८०, संस्थापक – करसनभाई पटेल – डिटर्जंट, साबण, कॉस्मेटिक्स क्षेत्र ।।



**प्रायोजक - श्री. अजित भिडे** (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**




शिबिरातून खूप काही शिकले. यानंतरही 'छात्र प्रबोधन'च्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला खूप आवडेल.

'अभ्यासोनी प्रकटावे !' या उक्तीप्रमाणे पुढे वाचन आणि अभिवाचन दोन्हीही करण्याचा प्रयत्न करेन. 'मुके कलावंत आणि बोलके रसिक' यांच्यामधला संवाद Interesting होईल असाही प्रयत्न करीन. एक वेगळाच समृद्ध करणारा अनुभव परत एकदा 'छात्र प्रबोधन'मुळे मिळाला. खूप भारी वाटलं. फक्त एकच वाटलं, की हे अभिवाचन शिबिर 'फक्त तीन'च दिवसांचं का होतं??

**– कु. मृण्मयी परळीकर** (इ. १२ वी)
अ-४०२,चिंतामणी कोर्ट, ३२० शनिवार पेठ, पुणे -30

# कार्यानुभव...

कार्यानुभव म्हणजे प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन काम करण्याचा अनुभव घेणं होय. असाच कार्याचा अनुभव मी व माझ्या मित्र-मैत्रिणींनी दहावीची परीक्षा संपल्यानंतर छात्र प्रबोधनच्या कार्यालयात घेतला. मासिकाचे लेखन, संपादन , संगणकाद्वारे छपाई कशी होते हे जवळून बघितले. विभागातील सदस्यांच्या सहवासातून -निरीक्षणातून आम्ही नवीन गोष्टी शिकलो. त्यातील काही अनुभव मी आपणासमोर मांडत आहे.

माझा काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव केवळ अविस्मरणीय. पुस्तक विक्री, त्यांचा हिशोब, पत्रं लिहिणे, पत्रात वापरण्याची अलंकारिक भाषा, मासिकांचे 'पोस्टिंग', तिकीट लावणे इ. असंख्य गोष्टी केल्या. हे अनुभव यापूर्वी मी कधीच घेतले नव्हते. ती कामं करताना धम्माल मजा आली. पुस्तकांचा स्टॉक घेण्याचे काम सोपं होतं पण वेळखाऊ होतं; तरी आम्ही चिकाटीने ते काम पूर्ण केलं. एकंदरीतच आम्ही अनेक अंगांनी समृद्ध झालो ते केवळ या कार्यानुभवामुळेच.

काही अनुभव आम्ही प्रथमच घेत होतो. त्यामध्ये बालोद्यान छापखान्याला भेट देण्याचा अनुभव हा अगदी नवीन आणि कायम स्मरणात राहील असा होता. ही प्रेस १९१० साली पुरुषोत्तम सहस्त्रबुद्धे यांच्या आजोबांनी सुरू केली. प्रेस म्हणजे फक्त छपाई (*printing*) हा गैरसमज या भेटीमुळे दूर झाला. छपाई सोडून इतरही छपाईसाठी लागणारी कामे उदा. फोल्डिंग, बाईंडिंग व पॅकिंग इ. येथे केली जातात.

सर्वप्रथम संगणकाच्या साहाय्याने एखाद्या मासिकाचं किंवा पुस्तकाचं बाह्यरूप निश्चित केलं जातं. त्यानंतर



बालोद्यान मधील प्रिंटींग मशीन

छपाईसाठी लागणाऱ्या प्लेट्स खोलीमध्ये तयार केल्या जातात. या खोलीमध्ये सूर्यप्रकाश व इतर कोणताही प्रकाश नसतो. मग सरांनी लॅमिनेशन मशिनचे कार्य, प्रिंटींग कसे होते, हे दाखवले. दर महिन्याला आपल्या घरी येणारी मासिके कशी छापली जातात? हे आम्हाला पाहायला मिळालं. अनेक यंत्रांबद्दल आम्हाला माहिती मिळाली.

आम्ही सर्व मित्रमंडळी छात्र प्रबोधनच्या काही सांघिक उपक्रमांशी देखील जोडले गेलो. गटकार्य समजण्यासाठी गटानं मिळून भेळ केली. भेळ करताना नुसती वस्तू खरेदी करून भेळ बनवणे किंवा त्या सर्व वस्तूंचा तपशील देणे एवढाच उद्देश नसून; त्यात आम्ही सर्वांचे गटातील एकेमेकांना दिलेले सहकार्य खूप महत्त्वाचे होते. गटात प्रत्येकाचा विचार जाणून घेणं व त्यानुसार कार्य करणं खूप महत्त्वाचं असतं. असा अनुभव प्रत्येक मुलानं एकदा तरी घ्यायलाच हवा, असं मला वाटतं.

हा कार्यानुभव उपक्रम मला खूप समृद्ध करून गेला.

**– चि. कौस्तुभ जोशी** (इ. १० वी)
श्री हौसिंग सोसायटी., धनकवडी, पुणे 411043

**झाले अधीर झाले, आषाढ मेघ सारे। मातीतुनी निघाले, मृद्गंध धुंद वारे।।**



।। **अधिक जाणून घ्या : इन्फोसिस** – स्थापना – १९८१, संस्थापक – एन. आर. नारायणमूर्ती – आयटी (सॉफ्टवेअर) क्षेत्र ।।

**प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.**

## पुस्तक परिचय




– कु. मंजिरी पुरोहित

‘कमीत कमी वेळात जास्तीत जास्त परिणामकारक काम कसे करावे’, या संदर्भात संशोधन करणाऱ्या आणि त्याचे प्रयोग आपल्या बारा मुलांवर करून पाहणाऱ्या इंजिनियर गृहस्थांचे पुस्तक म्हणजे ‘चीपर बाय दी डझन.’

फ्रँक गिलब्रेथ या गृहस्थावर त्यांच्या एका मुलीनं व मुलानं म्हणजेच फ्रँक बंकर गिलब्रेथ (ज्यु) व अर्नेस्टाइन गिलब्रेथ कॅरे यांनी मिळून हे अफलातून पुस्तक लिहिलं आहे. मूळ इंग्रजी असलेल्या या पुस्तकाचा मराठी अनुवाद ‘मंगला निगुडकर’ यांनी केला आहे.

डॅडींचा बारा मुले व पत्नी एवढा मोठा परिवार. आता एवढी बारा मुलं वाढवणं ही काही सोपी गोष्ट नाही. परंतु ‘आपल्या हुशारीचा आणि संशोधनाचा वापर डॅडींनी त्यांच्या मुलांच्या संगोपनात कसा केला’, त्याचं मनोरंजक वर्णन लेखकानं केलं आहे. पुस्तकाची भाषाशैली सरळ, सोपी, मनोरंजक व खुसखुशीत आहे.

हे डॅडींचं चरित्र आहे. त्यात डॅडींचं केलेलं वर्णन खुलवण्यासाठी दिलेली प्रसंगांची जोड वाचकांची उत्सुकता वाढवतं. हे पुस्तक जास्तीत जास्त मनोरंजक वाटण्याचं कारण म्हणजे त्यातील ‘प्रसंग वर्णन.’

एकदा डॅडींनी मुलांसाठी पंधरा दिवसात टंकलेखन शिकवण्याची पद्धत शोधून काढली. त्यासाठी डॅडींनी पांढऱ्या शुभ्र रंगाचे टाइपरायटर, एक सोनेरी चाकू व घड्याळ घरी आणलं. सर्वच मुलांना त्या यंत्रावर टंकलेखन करण्याची इच्छा होती. पण डॅडींनी सर्वांना अट घातली की, ‘जो आठवड्यानंतर सर्वात जलद टंकलेखन करेल; त्यालाच ते शुभ्र यंत्र, सोनेरी चाकू व घड्याळ वयानुसार भेट म्हणून वापरायला मिळतील’. प्रथम डॅडींनी टंकयंत्रावरच्या अक्षरांची आकृती असलेले कागद सर्वांना देऊन ती अक्षरे पाठ करायला सांगितली. त्यानंतर वेगवेगळ्या रंगांनी मुलांची बोटे रंगवली व तोच रंग टाईपरायटरवरील अक्षरांना दिला. मुलांना कोणत्या अक्षरावर कोणते बोट टेकवायचे, त्याचा सराव करण्यास सांगितलं. योग्य अक्षरावर योग्य बोट ठेवण्याचे कौशल्य सर्वात आधी अर्नेला जमले; म्हणून टाईपरायटर समोर बसण्याची पहिली संधी तिला मिळाली. या प्रकारे सर्वच जण टंकलेखन करायला शिकले. वरील प्रसंगातून डॅडींची हुशारी व सर्व मुलांना कमी वेळात परिणामकारक शिकवण्याची पद्धत आपल्या लक्षात येते.

या प्रसंगाप्रमाणेच त्यांनी कागद पेन्सिल न घेता, खास वेळ खर्च न करता, स्नान करता–करता फ्रेंच व जर्मन भाषा अस्खलित बोलायला कशा शिकवल्या, मोठ्या आकड्यांचे गुणाकार करायला कसे शिकवले या प्रसंगांचे वर्णन आहे.त्याचे वर्णन वाचताना डॅडी ते आपल्यालाच शिकवत आहेत, असं वाटतं. मोठं असलेलं घर सांभाळण्यासाठी स्थापन केलेलं कुटुंब मंडळ, वेगवेगळी कामं करण्यासाठी कामांचं केलेलं खातेवाटप; कोठेही गेले, तरी वही–पेन बरोबर घेऊन तेथील माहिती मिळवण्याची व त्याची नोंद ठेवण्याची मुलांना लावलेली सवय; या गोष्टी आपल्यासाठीही उपयोगी आहेत. आपण जर त्या अंमलात आणल्या तर त्याचा खरंच खूप फायदा होईल.

डॅडींच्या व्यक्तिरेखेबरोबरच पुस्तकाचा अजून एक महत्त्वाचा भाग म्हणजे मुलं. गिलब्रेथ कुटुंबात बारा मुलं आहेत. त्यांच्या वयातही बराच फरक आहे. मोठ्या मुली, सहावी–सातवीतील मुले व छोटी



आषाढीच्या आवडीचा, आज मेघराज वर्षे। मन बालक होऊनी, नाचे मयुराच्या हर्षे।।

।। **अधिक जाणून घ्या : हिरो समूह** – स्थापना –१९८२, संस्थापक – ब्रिजमोहनलाल मुंजळ – ऑटोमोबाइल क्षेत्र ।।



**दहावी-बारावी, कलचाचणी पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन** – प्र. मा. संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

मुले यांच्या वयातील, स्वभावातील फरक मोठ्या खुबीनं आपल्यासमोर येतो. दोन पिढ्यातील फरकांमुळे होणारे मतभेद वाचताना, त्या गोष्टी आपल्यालाही फार जवळच्या वाटतात.

पुस्तक वाचल्यावर आपण व गिलब्रेथ कुटुंबातील मुले यांच्या भावविश्वात काहीच फरक नाही असं वाटतं. त्याचप्रमाणे बारा भावंडे असूनही सर्व मुले व आई-वडील यांच्यातील नात्याचा बंध आपल्याला भारावून टाकतो.

डॅडींचा गमत्या स्वभाव, त्यांना असलेली चेष्टा-मस्करीची आवड, त्यांची हुषारी, कष्ट करण्याची तयारी, थोडे कडक असले तरीही कुटुंबावर त्यांचं असलेलं प्रेम! अशा स्वभावाचे डॅडी डोळ्यांसमोर उभे राहातात. पुस्तक वाचताना गिलब्रेथ कुटुंबात आपणही हरवून जातो.

डॅडी व त्यांची बारा मुले यांच्यावरील हे पुस्तक मनोरंजक व प्रेरणादायी असून एकदा वाचायला घेतले की ते पूर्ण झाल्याशिवाय ठेवावेसे वाटत नाही.

**पुस्तकाचे नाव-चीपर बाय दी डझन**
**लेखक** - फ्रँक बंकर गिलब्रेथ (ज्यु)
अर्नेस्टाईन गिलब्रेथ कॅरे
**अनुवाद** - मंगला निरगुडकर
**प्रकाशन** - मेहता पब्लिशिंग हाऊस
**पृष्ठसंख्या**-१४४ **किं.**- ₹१००/-

★★★

- **कु. मंजिरी पुरोहित** (इ. १० वी)
सेनापती बापट रस्ता, पुणे 16

---

# छात्र प्रबोधन





**ज्या मासिकाने जिंकले**
**आम्हा सर्वांचे मन**
**त्याचेच नाव आहे**
**छात्र प्रबोधन।।१।।**

**ज्याने केले आमच्या**
**प्रतिभांचे शोधन**
**त्या छात्र प्रबोधनला**
**माझे मनस्वी वंदन।।२।।**

**प्रत्येक पान भासतं मला**
**आगळेवेगळं वैशिष्ट्यपूर्ण**
**त्यातूनच सापडला मला**
**नव्या कौशल्यांचा सुवर्ण।।३।।**

**विद्यार्थ्यांच्या विकासासाठी**
**तुम्ही किती सक्रिय राहता**
**म्हणूनच कृतज्ञतेने**
**लिहीली मासिकावर कविता।।४।।**



**वाचताना छात्र प्रबोधन**
**मिळतो खूप आनंद**
**विविध गुण अंगी येता**
**गवसतो मला स्वानंद।।५।।**



- **कु. आकांक्षा भवर** (इ. ८ वी)
जि. प. शाळा, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली


डोळे लागले आभाळी, आळवितो बळिराजा। मायेची पाखर घाल रे, पर्जन्यराजा।।



।। अधिक जाणून घ्या : **युनायटेड ब्रीव्हरीज** - स्थापना -१९८३, संस्थापक - विजय मल्ल्या - ब्रीव्हरी क्षेत्र ।।

**सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल** - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

# शब्दकोडं



**आडवे शब्द**

१) रक्षक
५) लाल रंगाचे रत्न
७) मर्दन
११) च्यात सहभाग असणे
१३) माती किंवा वाळू
१५) स्त्रियांचा एक पोशाख
१६) न्यूनता
१७) लाल रंगाचा महाग मसाल्याचा पदार्थ
१८) मनोहारी विलोभनीय
२२) अभिप्राय
२४) सात सागरांच्या पलीकडे

**उभे शब्द**

१) वाळूतील रेघोट्यांवर भविष्य सांगणे
२) वसा
३)किंमत
४) रसाने भरलेला
६) हात
८) लाल रंगाचे  कंदमूळ
९) लक्ष्मी
१०)चहा पिण्यासाठी वापरले जाणारे पात्र
११) प्रश्न
१२) मृतदेह
१४) ज्याला मृत्यू नाही असा
१५) तार छेडून वाजवायचे शास्त्रीय वाद्य
१६) व्यायाम
१९) १० व्या क्रमांकाची रास
२०) मृत्यूदेवता
२१) समुदाय/गट
२३) शेतातील अनावश्यक गवत

( ‘घे भरारी’ हस्तलिखित – न्यू इंग्लिश स्कूल, सातारा)

## *हसा हसा..*

भला मोठा ट्रान्सफॉर्मर लावलेल्या विजेच्या खांबावर विद्युत मंडळाने लावलेला एक फलक..
‘धोका ! या खांबाला स्पर्श करू नका. स्पर्श करणारा जिवंत राहणे केवळ अशक्य आहे. यावरही जे स्पर्श करतील त्यांच्यावर कायदेशीर इलाज केला जाईल.’

‘माझा कुत्रा’ या विषयावरचा महेश्वरचा निबंध वाचून शिक्षक म्हणाले, ‘‘अरे, हा निबंध तर तंतोतंत तुझ्या भावाने लिहिलेल्या निबंधासारखा आहे.’’
‘‘आमच्याकडे एकच कुत्रा आहे सर... त्यामुळे त्यावरच निबंध लिहावा लागला आम्हाला.’’ महेश्वर म्हणाला.

काळे मेघ आकाशी येती अन् जाती। पावसाच्या थेंबांना हुलकावणी देती।।

।। **अधिक जाणून घ्या : अडाणी समूह** – स्थापना – १९८८, संस्थापक – गौतम अडाणी – एनर्जी गॅस, लॉजिस्टिक क्षेत्र ।।




असा श्रावण लहरी, आता सर आता ऊन। राऊळात पावसाची घुमे प्रासादिक धून।।



।। **अधिक जाणून घ्या : एन. डी. टीव्ही** – स्थापना – १९८८, संस्थापक – राधिका प्रणय रॉय – टेलिव्हिजन ब्रॉडकास्टिंग क्षेत्र ।।



# छंद जोपासत शिक्षण

– कु. रितिका साठे

चौदा विद्या व चौसष्ट कला देवानं निर्माण केल्या आहेत. त्यापैकी प्रत्येकाच्या अंगी कोणती ना कोणती कला असते. त्यामुळे प्रत्येकानं आपल्यातली ती कला ओळखून त्याला विकसित करणं गरजेचं असतं. 'अभ्यासाबरोबरच एखादी कला आवर्जून जोपासावी', असं मला वाटतं.

असंच काहीसं माझ्या बाबतीत झालं. लहानपणी पहिली–दुसरीत असताना घरी एखादी गाण्याची कॅसेट लागली की माझे पाय ताल धरायचे; त्या ठेक्यावर मी नाचायचा प्रयत्न करायचे. तशाच प्रकारे गोष्टीची कॅसेट ऐकून मी गोष्टी सांगण्याचाही प्रयत्न करायचे. तेव्हा शिक्षकांनी माझ्यातली वक्तृत्व व नृत्यकला ओळखली. वेगवेगळ्या वक्तृत्व स्पर्धा असोत अथवा शालेय व आंतरशालेय कार्यक्रम व स्पर्धा असोत त्यामध्ये मी भाग घेऊ लागले आणि बक्षिसं मिळवू लागले. सुमारे दहा वर्षांपूर्वी नृत्याचे किंवा बालनाट्याचे एवढे प्रशिक्षण वर्ग नव्हते. शिक्षकांकडून जेवढे शिकता येईल तेवढे मी शिकत होते; पण चौथीनंतर मी रीतसर कथ्थक नृत्याचे धडे घ्यायला सुरुवात केली.

इ. पाचवी/सहावीमध्ये कथ्थक नृत्याच्या मी दोन परीक्षा दिल्या. हळूहळू अभ्यास वाढत गेला. त्यामुळे नृत्याच्या शिकवणीत खंड पडला. नववीत असताना सुट्टीत मी नृत्य शिकण्याचा खाजगी वर्ग सुरू केला. त्यावेळच्या माझ्या गुरुंनी 'प्रज्ञाताई लाजूरकर', यांनी मला वेगवेगळे नृत्य प्रकार शिकवले. मग छोट्या–छोट्या नृत्यस्पर्धा जिंकत गेले व त्यामुळे माझा आत्मविश्वास, सभाधीटपणा, जिद्द, नृत्याबद्दलची निष्ठा वाढत गेली.

२०११ साली पुण्यात एक मोठी नृत्य स्पर्धा आयोजित केली होती. त्याची निवड चाचणी मी दिली. शंभर ते दीडशे जणांतून त्यावेळी माझी अंतिम फेरीसाठी निवड झाली. अंतिम फेरीत नृत्य सादर करण्यासाठी मध्ये ४–५ दिवसांचा अवधी होता. लोकनृत्य व आणखी एक वेगळ्या प्रकारचे नृत्य मला सादर करायचे होते. हे एक मोठंठ् आव्हान होतं. या अंतिम फेरीसाठी मी व माझ्या गुरूंनी खूप मेहनत घेऊन तयारी केली. तेव्हा मी दिग्गज परीक्षकांसमोर नृत्य सादर केले. त्या स्पर्धेत मी पहिली येऊन *'पुणे डांन्सिंग स्टार'* हा किताब पटकावला. तो क्षण आजही माझ्या लक्षात आहे आणि माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. ती ट्रॉफी, ते बक्षीस व तो मिळालेला मान सर्वकाही माझ्यासाठी अनमोल होते. नृत्य सादर करताना तुमची गाण्याची निवड, तुमचा पोशाख, तुमचे हावभाव (*Expression*), तुमचे सादरीकरण या गोष्टी महत्त्वाच्या असतात. या निमित्ताने हे उमगले. पुढे मला माझ्या अहिल्यादेवी शाळेतर्फे भोपाळला महाराष्ट्र राज्याचे सांघिक नृत्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर *डॉक्युमेंट्री, शॉर्टफिल्म, मुव्ही,* बालनाटकं यांमध्येही भूमिका करत मी अभिनयाची संधी घेत–घेत समृद्ध होत गेले.

अनेक जण मला कित्येकदा म्हणायचे की, ''तू *रिॲलिटी शोच्या ऑडिशनला* का नाही जात?'' किंवा ''सिरियलसाठी का नाही प्रयत्न करत?'' पण कधी कधी आपल्या मनाची तयारी नसते, अभ्यासही तितकाच महत्त्वाचा वाटतो. पण मला वाटतंय एक ना एक दिवस मी स्वत: नृत्यात पारंगत होऊन स्वत:ला सिद्ध करेन; एक चांगली अभिनेत्री म्हणून... नृत्यांगना म्हणून... अष्टपैलू कलाकार म्हणून...

मी आज कला शाखेत स. प. महाविद्यालयात बारावीत शिकत आहे. मला 'शर्वरीताई जमेनिस' या कथ्थक नृत्यासाठी गुरू म्हणून लाभल्या आहे. इतर



अशा पावसात कुंद, रान झालं चिडीचिप। पान पान ठिबकतं, शिवारात ओला गंध।।

।। **अधिक जाणून घ्या : एच.सी.एल. समूह** – स्थापना – १९९१, संस्थापक – शिव नाडर – आयटी (हार्डवेअर) क्षेत्र ।।



**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रिपरेटरी व फाऊंडेशन कोर्स** - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४




नृत्यप्रकार शिकण्यासाठी 'पूर्वाताई पुरंदरे' व 'प्रशांत पारखे' सर हे गुरू म्हणून लाभलेत. मी माझ्या मनाशी पक्की खूणगाठ बांधली आहे की, 'गुरू व आईवडिलांशी, कलेशी प्रामाणिक राहून नृत्याची साधना करणं, कष्ट करणं व त्या कलेचं पूर्ण शिक्षण घेणं.

माझ्या परिश्रमांबरोबरच माझ्या आई-बाबांनी दिलेला पाठिंबा, प्रोत्साहन यांचाही खूप महत्त्वाचा वाटा आहे. माझ्या जेवणाच्या वेळा सांभाळणं, क्लासेसला घेऊन जाणं इ. गोष्टी न कंटाळता ते माझ्यासाठी करतायंत. अभ्यास व नृत्याचं शिक्षण, वेगवेगळ्या स्पर्धा, पुण्यात सादर होणाऱ्या सांस्कृतिक महोत्सवात *(पुणे फेस्टिव्हल)* सहभाग अशी तारेवरची कसरत करताना कधी-कधी दमछाक होते. स्पर्धेत भाग घेतल्यानंतर चांगल्या अनुभवांबरोबर काही कटूप्रसंगही येतात; त्यामुळे वेळप्रसंगी मी खचून जाते. पण आईवडील व नृत्याचे गुरू तेव्हा मला उभारी देतात, प्रोत्साहन देतात. त्यामुळे परत मी स्वत:ला सिद्ध करायला समर्थपणे उभी राहू शकते.

आज सर्वसाधारणपणे असे आढळते की मुलांना लहान वयात लवकर प्रसिद्धी हवी; पण ती प्रसिद्धी चिरकाल टिकण्यासाठी खूप कष्ट, प्रयत्न करावे लागतात. अभ्यास सांभाळत त्याची तयारी मात्र प्रत्येकानं ठेवली पाहिजे, मग यश आपलेच असते.

★★★


**- कु. रितिका साठे** (इ. १२ वी)
११४३ 'दीपक', शुक्रवार पेठ, पुणे 411002

**करून तर पाहा**


# *कागदी हिरा*

**कागदाचा आकार :-** (३०x२५) सेमी² चा एक तुकडा

**पद्धत :-**




१. O केंद्रबिंदू घेऊन ५ सेमी त्रिज्येचे वर्तुळ काढा त्यात षट्कोन काढा.
२. षट्कोनाचे सर्व शिरोबिंदू मध्यबिंदूशी जोडा.
३. षट्कोनातील पाच बाजूंवर समद्विभुज त्रिकोण काढा.
(दोन समान बाजूंची लांबी त्रिज्येपेक्षा जास्त असावी. उदा.७ सेमी.)
४. पाचही त्रिकोणांच्या एका आड एक बाजूंना चिकटपट्ट्या ठेवा व षट्कोनातील सहाव्या भागाचा आपण चिकटपट्टी तयार करण्यासाठी वापर करणार आहोत.
५. तुटक रेषांवर कर्कटक फिरवा व जाड रेषांवर कापा.
६. AB, BC, CD, DE, EF खालच्या बाजूला दुमडा.
७. चिकटपट्ट्या दिलेल्या क्रमाने चिकटवा. OA-OF, AG-FK, IE-EK, ID-DJ, HC-CI, HB-BG



**कल्पक बदल :-** षट्कोनाऐवजी अष्टकोन काढून त्यातील ७ भाग वापरून आपल्याला ७ बाजूंचा हिरा तयार करता येईल. ८ वा भाग चिकटपट्टीसाठी वापरला जाईल.

(पुनर्मुद्रण : पुस्तकाचे नाव -त्रिमितीची किमया, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन)

अमृताचा शिडकाव, केला कसा पावसाने। वठलेल्या बुंध्यांना, आली पाहा फुले पाने।।




।।**अधिक जाणून घ्या - सन समूह** - स्थापना - १९९२, संस्थापक - कलानिधी मारन - टेलिव्हिजन ब्रॉडकास्टिंग क्षेत्र।।

**NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण** - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

# रहस्य त्या झाडाचे

– कु. आरती चौधरी



‘सांगवी’नावाचं औद्योगिकदृष्ट्या थोडंसं पुढारलेलं गाव असतं. पोटापाण्यासाठी, रोजगारासाठी लोकं खेड्यातून त्या गावात चरितार्थासाठी येत असतात.

त्या गावात चतुर, शहाणी, जिज्ञासू अशी हरप्रित, अली, जॉन, शर्वरी आणि श्लोक अशी मुले राहत असतात. त्यांची मैत्री अगदी अतूट! ते सर्व दुसऱ्यांना मदत करायला तत्पर असत. सर्वचजण कमालीचे चौकस होते. गावात काहीही घडलं तर त्यांना समजल्याशिवाय राहत नव्हतं. या मुलांनी त्यांच्या *टीमचे* नाव ठेवले होते, *‘डिटेक्टिव्ह टायगर्स’*. प्रत्येक गोष्टीचा ते जिज्ञासू वृत्तीनं अभ्यास करत.

त्यादिवशी परीक्षेचा शेवटचा दिवस होता; सुट्ट्यांचा श्रीगणेशा करण्यासाठी त्यांनी गावाबाहेरच्या एकमेव बगिच्यात जाण्याचं ठरवलं. ठरवल्याप्रमाणे सर्व बगिच्यात गेले आणि मनसोक्त खेळले. घरी आल्यावर अलीनं अचानक सर्वांना फोन लावला आणि म्हणाला, ‘‘सर्वजण मला आपल्या *सिक्रेट* जागेवर भेटा.’’ झालं तर मग... अलीनं सांगितल्याप्रमाणे सर्वजण त्यांच्या *सिक्रेट* जागेवर पोहोचले. शर्वरी म्हणाली,


‘‘काय रे अली, इतक्या घाईघाईत का बोलवलं?’’

अली, ‘‘अरे, गावात बातमी पसरलीय की, जुन्या मंदिराजवळचं झाड बोलू लागलंय. एका व्यक्तीनं ते ऐकलंय. त्याची चर्चा गावात होतेय.’’

श्लोक, ‘‘काय? झाड बोलतंय, अशक्य!’’

जॉन म्हणाला, ‘‘अरे, येथे आपण वादविवाद काय करतोय, त्या ठिकाणी जाऊन तपास करूया.’’

सर्वजण घटनास्थळी पोहचतात. ज्या व्यक्तींनी ही विचित्र घटना प्रत्यक्ष पाहिली, तिला सर्वजण भेटतात.




‘‘काका, तुमच्यासोबत नेमकं काय घडलं?’’ अली म्हणाला.

‘‘मुलांनो, मी परगावहून परत येत होतो. आपल्या महादेवाच्या मंदिराजवळ पोहचल्यावर मला अचानक विचित्र आवाज ऐकायला येऊ लागले. माझ्या तोंडचे तर पाणीच पळाले.’’

शर्वरी, ‘‘काका... पुढे काय झालं.’’

रामू काका, ‘‘सांगतो. मी त्या आवाजाच्या दिशेनं गेलो तर खूप वर्षांपूर्वीचं ते जुनं झाड जोरजोरात हलत होतं आणि बोलतंही होतं. अगदी भूतासारखं!’’

**‘‘झाड म्हणत होतं की जर गावकऱ्यांनी मला धान्य दिलं नाही, तर गावकऱ्यांचे हाल कुत्रं खाणार नाही; अशी त्यांना मी अद्दल घडवीन. हे ऐकून मी तेथून धूम ठोकली आणि थेट कलेक्टर साहेबांपाशीच गेलो. त्यांचा या गोष्टीवर विश्वासच बसेना. मग मी त्यांना घेऊन झाडापाशी गेलो.’’**

जॉन, ‘‘काका, पण त्यानं धान्य कुठं व केव्हा मागितलय?’’

रामू काका, ‘‘त्यानं अन्नधान्य महादेवाच्या मंदिराजवळ, तेही उद्याच्या उद्या मागितलं आहे.’’



आला पहिला पाऊस, शिंपडली भुई सारी। धरित्रीचा परिचय, माझं मन गेलं भरी।।

।। **अधिक जाणून घ्या – हॉट मेल** – स्थापना – १९९६, संस्थापक – सबीर भाटिया – ई–मेल क्षेत्र ।।



**७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार -** संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

अली, ''चला तर, आपल्याला तात्काळ कलेक्टर साहेबांकडे जायला हवं.''

सर्वजण कलेक्टरसाहेबांकडे जातात.

हरप्रित, ''सर, तुम्ही त्या झाडाची मागणी पूर्ण करणार? 'झाड बोलतंय' याच्यावर तुमचा विश्वास आहे का?''

''मुलांनो, हे प्रकरण काय आहे, त्याच्या तपासाची दिशा ठरते आहे. त्याबाबत आम्ही एक समिती स्थापन केली आहे. बघूया काय होतंय ते !'' कलेक्टर म्हणाले.

अली म्हणाला, ''*प्लीज* आम्हालाही येऊ द्या ना तुमच्या समितीत.''

''नाही, ते शक्य नाही.''

सर्वजण, ''सर, *प्लीज* आम्ही त्या ठिकाणी जाऊन तर येऊ शकतो ना?.''

''तुम्ही सर्वजण दुरूनच ते झाड पाहू शकता. पण तिथे कोणतीही गडबड तुम्ही करायची नाही.'' कलेक्टर म्हणतात.

सर्व *टीम* त्या झाडाचं दुरूनच; पण बारकाईनं निरीक्षण करतात. तरीही त्यांचं समाधान होत नाही.

''शर्वरी, आत्ता इथे वर्दळ आहे. संध्याकाळी या ठिकाणची पुन्हा एकदा कसून तपासणी आपल्याला करायला हवी.'' श्लोक.

सर्वांनी यावर होकार दिला. ''अरे, पण जाताना सामान काय न्यायचं?'' हरप्रित

अली म्हणाला, ''अरे, माझ्या वडिलांकडे छोटा कॅमेरा आहे, तो बरोबर नेऊ.''

शर्वरी, ''अरे, पण त्याबरोबरच टॉर्च, मोबाईल, डायरी, पेन न्यावे लागेल ना?''

हरप्रित, ''हो, हो चला कामाला लागा. संध्याकाळी सात वाजता सर्वांनी आपापल्या सायकली घेऊन शाळेच्या बाहेर या. चला तर मग ठरलं.''

सर्वजण मंदिराजवळ आले. तेथे नीरव शांतता होती. त्यांनी आपापल्या सायकली दूर लावल्या आणि कामाला लागले.

जॉन म्हणाला, ''अली, अरे हे बघ काय?''

अली, ''काय रे, हे झाड तर मधून पोकळ आहे. अरे, येथे तर एखाद्या माणसाच्या राहण्याच्या खाणाखुणाही दिसताहेत. येथे नक्की काहीतरी असलं पाहिजे.''

हरप्रित म्हणाला, ''मलाही तसंच वाटतं. मी आणि जॉन जाऊन पाहतो.''

पाहतात तर, तिथे खोडाचा काही भाग पोकळ होता. त्या भागात कपड्यांचं गाठोडं, जुना टेपरेकॉर्डर होता. हे सामान झाडांच्या पानांनी झाकलेलं होतं. तेवढ्यात त्यांना इतर मुलांचा गलका ऐकू येतो.

'धावा, पकडा त्याला...' असा श्लोकचा आवाज ऐकू येतो. जॉन बघतो तर दाढी वाढवलेल्या एका माणसाच्या मागे श्लोक धावत असतो. 'आपण पकडले जाणार' या भीतीने मुलांना तिथे बघून तो माणूस पळत सुटतो. तेवढ्यात तिकडून कलेक्टर साहेबांसोबत पोलिसही येतात. त्या माणसाला ताब्यात घेतात.

''तूच तो भामटा आहेस तर ! जो झाडाच्या आड दडून वेगवेगळ्या मागण्या करतोय...'' कलेक्टर साहेब जरबेनं म्हणतात.

''नाही साहेब, माझं थोडं ऐकून घ्या. गेली अनेक वर्षे या गावानं कोरडा दुष्काळ पाहिला; पण झाडांची बेसुमार वृक्षतोड सुरूच आहे. झाडांमुळे आपल्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजा भागतात. तरीही 'वृक्षतोड करू नये' हे लोकांच्या लक्षात येत नाही. चमत्कार केल्याशिवाय लोक बधणार नाहीत म्हणून 'झाड बोलतंय' असं गावात मीच उठवलं. अन्नधान्याला हे लोक महाग झाल्याशिवाय त्यांना अक्कल येणार नाही; म्हणून मी धान्याची मागणी केली. आता तुम्ही द्याल ती सजा मला मंजूर आहे.'' तो माणूस प्रामाणिकपणे म्हणाला.

''या आपल्या *टीमबरोबर* 'झाडं वाचवण्या'विषयीचं जागरण तुम्ही गावासाठी करायचं; हीच तुमची शिक्षा.'' कलेक्टर हसत म्हणाले.


''मंजूर'', सर्व मुलं एकसाथ ओरडतात.


★★★


**– कु. आरती चौधरी** (इ. ९ वी)
विवेकानंद विद्यालय,
चोपडा, जि. जळगाव


हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० आषाढ, शके १९३६, १ जुलै २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.


# हा खेळ सावल्यांचा


























सौर आषाढ, शके १९३६/जुलै २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० आषाढ, शके १९३६ /१ जुलै २०१४
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 / 2012 - 2014,
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक : WPP- 21.Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month



**सांजसावळी सागरतीरी !!**

हा फोटो गोव्यातील 'फोर्ट अॅग्वादा' येथून काढला आहे. हा फोटो काढत असताना त्या ठिकाणी सूर्य मावळताना समुद्राचे दृश्य फार विलोभनीय होते, ते टिपण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**– चि. रुचिर कुलकर्णी,** ruchirkulkarni007@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

सौर दिनदर्शिका
शके १९३६

| | जुलै २०१४ | आषाढ श्रावण |
|---|---|---|
| मं. | 1 | १० |
| बु. | 2 | ११ |
| गु. | 3 | १२ |
| शु. | 4 | १३ |
| श. | 5 | १४ |
| र. | 6 | १५ |
| सो. | 7 | १६ |
| मं. | 8 | १७ |
| बु. | 9 | १८ |
| गु. | 10 | १९ |
| शु. | 11 | २० |
| श. | 12 | २१ |
| र. | 13 | २२ |
| सो. | 14 | २३ |
| मं. | 15 | २४ |
| बु. | 16 | २५ |
| गु. | 17 | २६ |
| शु. | 18 | २७ |
| श. | 19 | २८ |
| र. | 20 | २९ |
| सो. | 21 | ३० |
| मं. | 22 | ३१ |
| बु. | 23 | श्रा. १ |
| गु. | 24 | २ |
| शु. | 25 | ३ |
| श. | 26 | ४ |
| र. | 27 | ५ |
| सो. | 28 | ६ |
| मं. | 29 | ७ |
| बु. | 30 | ८ |
| गु. | 31 | ९ |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –